आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे
वर्ष ३१ वे अंक अकरावा पृष्ठे १४ नोव्हेंबर २०२२ www.parlekar.com
Registered-RNI no. 54781/92

या अंकात
पान ०२ छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालय (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम)
पान ०३ विलेपार्ल्याचा चैतन्यमय, तारुण्याने सळसळणारा असा उत्साहवर्धक ज्ञानपथ!!
पान ०४ पार्ल्यातील एक थोर व्यक्तिमत्व डॉ. व. दि. कुलकर्णी
पान १० लीमरच्या देशात



पान ६
कलासक्त नोटेशन गुरु
श्री. अरविंद मुखेडकर

# सिरुर बालकाश्रमातील लहानग्यांची दिवाळी


मुंबई प्रार्थना समाज संचालित द.ना.सिरुर बालकाश्रम या संस्थेला आता जवळजवळ ९०वर्षे पूर्ण झाली आहेत. या संस्थेतील मुलांवर मुलभूत गरजांसोबतच चांगले संस्कार केले जातात. १८ वर्षापर्यंत हेच बालकाश्रम मुलांचे घर असते व त्यानंतर त्यांच्या कलानुसार शिक्षणासाठी ही संस्था मदत करते. या संस्थेत शिक्षणापलीकडे मैदानी खेळ आणि हस्तकलेला सुद्धा वाव दिला जातो. त्यांनी बनविलेल्या वस्तू हव्या असल्यास संस्थेत येऊन विकत घेऊ शकतात. कोव्हीड काळात जरी संस्थेला फारसे अनुदान मिळाले नाही तरीसुद्धा संस्थेचे काम थांबले नाही. विलेपार्ल्यात लोकांकडून बऱ्यापैकी देणगी येते तसेच पार्लेकरांचे सहाकार्य त्यांना वेळोवेळी लाभते.











या संस्थेचे सध्याचे अधिक्षक पुष्कर वाघ हे सुद्धा त्या संस्थेचेच विद्यार्थी होते. इतर काही माजी विद्यार्थी सुद्धा या संस्थेशी जोडलेले आहेत. आतापर्यंत या संस्थेतून जवळपास ९० हजार विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे तसेच अनेक कलाकार आणि समाजसेवकांनी देखील संस्थेला भेट दिली आहे. दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा जरी लोप पावत असली तरी हे विद्यार्थी ही परंपरा जपताना दिसून येतात.



## संपादकीय

आपले पार्ले हे विद्येचे माहेरघर आहे त्याचप्रमाणे ते मुंबईतील महत्वाचे सांस्कृतिक केंद्र सुद्धा आहे. अनेक क्षेत्रातील दिग्गज मंडळींचे वास्तव्य पार्ल्यात आहे किंवा त्यांची पार्ल्यात राहायला यायची मनोमन इच्छा आहे. ह्या सगळ्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे. पण मित्रांनो, ह्या गोष्टी काही पटकन जुळून येत नाहीत. यासाठी पार्ल्यातील शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांनी अनेक तपे केलेली अपार मेहेनत कारणीभूत आहे हे नाकारता येणार नाही. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज पार्ल्याच्या सामाजिक जीवनाला एक ऊंची प्राप्त झाली आहे.

या सर्वात एक गोष्ट विसरली जाते ती म्हणजे पार्ल्यातील लोक चळवळी. मोठ्या संस्थांकडे स्वत:ची वास्तू असते, पैश्याचे पाठबळ असते, त्याचा खूप मोठा फायदा कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात होतो. लोक चळवळी ह्या काही समविचारी तरुणांच्या डोक्यातील फक्त कल्पना असतात, त्यांच्या डोळ्यासमोर भविष्यातील समाजाचे चित्र असते, त्यांच्या प्रतिभेची भरारी असते. अशाच विचार मंथनातूल पार्ल्यात स्वातंत्र्यानंतर सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात अनेक लोक चळवळी उभ्या राहिल्या. ह्यात मामा कुलकर्णींची हुंडा विरोधी चळवळ, तात्या पटवर्धनांची संगीत नाटकांची चळवळ, विजय बोन्द्रेचा गॉसिप ग्रुप, आपटे सरांची जनसेवा समिती, त्याच बरोबर शेफाली, मृगजळ, प्रथमेश, हृदयेश, उत्तुंग, पार्ले कट्टा, प्रबोधन मंच ह्यासारख्या संस्था, ह्या सर्वांनीच पार्ल्यातील सामाजिक सांस्कृतिक वातावरण टिकविण्यात आणि वृद्धिंगत करण्यात महत्वाचा वाटा उचलला आहे. मामांच्या हुंडा विरोधी चळवळीचा दबदबा महाराष्ट्रभर होता. गॉसिप ग्रुपनी बसवलेली अफलातून नाटके, त्यावरून उफाळलेले वैचारिक वाद ह्याची आठवण आजही नाट्यक्षेत्रात निघते. एकेकाळी मृगजळ एकांकिका स्पर्धा मुंबईतील अग्रगण्य स्पर्धा समजली जात असे. प्रथमेश, हृदयेश, ह्यांनी पार्ल्याला दिलेला संगीताचा संस्कार कधीही न विसरण्यासारखा आहे. जनसेवा समितीच्या कुठल्याही उपक्रमात सहभागी न झालेला तरुण पार्ल्यात शोधूनही सापडणार नाही. पार्ले कट्ट्यावर येणारा पाहुणा संपूर्ण पार्ल्याचाच लाडका होतो. प्रबोधनच्या सामाजिक विषयांवरील कार्यक्रमांमधे लोकांचा ऊस्फुर्त सहभाग असतो. कुठलेही पाठबळ नसताना केवळ आंतरिक उर्मीने, सामाजिक जाणीवेने आणि दुर्दम्य आत्मविश्वासाने मार्गक्रमण करणाऱ्या ह्या संस्थांनी पार्ल्याची सांस्कृतिक परंपरा समृद्ध केली आहे ह्यात शंका नाही.

पार्ल्याच्या विषय निघाला कि अनेकवेळा फक्त मोठ्या, मान्यवर संस्थांचा उल्लेख होतो, त्यांच्या कार्याचा गौरव होतो व बहुतेक वेळी ह्या लोक चळवळींचा विसर पडतो. तसे होता कामा नये. पार्ल्याच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रवासात त्यांचे योगदान सुद्धा महत्वाचे आहे, होय ना !


आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
सलोनी पाटील
editorial@parlekar.com


**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


# छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालय
## (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम)



स्थापत्य कलेचा उत्कृष्ट, वैभवशाली, सर्वांगसुंदर नमुना म्हणून 'प्रिन्स ऑफ वेल्स' म्युझियमच्या इमारतीचे वर्णन करता येईल. इ.सन १९०५ साली या म्युझियमचा पायाभरणी समारंभ प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते त्यांच्या मुंबई भेटी दरम्यान झाला. इ.सन १९१४ मधे इमारत बांधून पूर्ण झाली. पहिले महायुद्ध चालू झाल्यावर या इमारतीचा उपयोग लष्करी इस्पितळ म्हणून करण्यात आला. इ.सन १९२३ यावर्षी लेडी लॉईड या गव्हर्नर पत्नीच्या हस्ते म्युझियमचे रितसर उद्घाटन झाले.

जॉर्ज विटेट या वास्तुविशारदाने निर्माण केलेल्या दोन महत्त्वाच्या इमारती म्हणजे इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स व जहांगीर कासवजी हॉलची जोड इमारत व दुसरी प्रिन्स ऑफ वेल्स इमारत. मात्र या दोन्ही इमारती पूर्णपणे दोन भिन्न शैलीत उभारल्या आहेत.

'प्रिन्स ऑफ वेल्स' ची इमारत इंडोसारसेनिक शैलीत असून प्रशस्त अशा अर्धचंद्राकृती आवारात सुंदर बगीचांनी वेढलेली आहे. इमारतीसाठी बफ व ब्लू बासाल्ट (लाव्हा पाषाण) वापरलेला असून तो मुंबई परिसरातील खाणींमधून काढलेला आहे. सर्वत्र दगडांचा अतिशय सुनियोजित वापर केलेला आढळतो. स्वतंत्र जागेवर उभारलेली ही इमारत जरी इंडोसारसेनिक शैलीत बांधलेली असली तरी त्याच्यात इथल्या पारंपारिक बांधणी शैलीचे मनोज्ञ मिलन वास्तुविशारदाने केले आहे. म्युझियमचा घुमट विजापूरच्या गोल घुमटाची आठवण करून देणारा आहे. मनोऱ्यांच्या शिखरांवरील छोट्या गोलाई, सारसेनिक शैलीच्या कमानीतील नक्षीदार जाळ्या, राजपुत डौलाचे झरोके, हिंदू देवालयातील बेळकी (ब्रॅकेट्स) आणि अर्धोन्मीलित गुढव्हरांडे अशा विविध शैलीतून घेतलेल्या असमान गोष्टींचा इथे सहज सुंदर मिलाफ घडवलेला आहे. इ.सन १९३६ ला ग्रेगसनबाटले अँड किंग या वास्तुविशारद संस्थेने डिझाईन केलेला एक नवा विभाग या इमारतीस जोडण्यात आला. (सदर विभाग नैसर्गिक इतिहास नावाचा असून यात अनेक आश्चर्यकारक वस्तूंचा संग्रह आहे.)

सर्व म्युझियम तपशीलवार हिंडून पाहण्यास एक दिवस अपुरा पडेल. इमारतीच्या अंतर्गत भागात तसेच बगीच्यात असंख्य प्रेक्षणीय, पौराणिक, ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तू जतन करून ठेवल्या आहेत. त्यातील खूप मोठा संग्रह रतन टाटा यांनी भेट दिलेला असून त्यात पेंटिंग्स, पौर्वात्य शस्त्रास्त्रे, मौल्यवान जडजवाहीर, चिनी मातीच्या वस्तू, चांदी रुपे यातील कलाकुसरीच्या भारतीय हस्तशिल्पातील नमुने, वेगवेगळ्या धातूंपासून बनवलेल्या कलाकृती, अशा अगणित वस्तू आहेत. सर दोराबजी टाटा यांनीही कमालीचे वैविध्य असलेला आपला संग्रह या म्युझियमला भेट दिलेला आहे; ज्यात राजपूती शैलीतील मिनीचर पेंटिंग्सचा मोठा साठा आहे. श्री. कार्ल खंडेलवाल या अनेक वर्ष या म्युझियमचे ट्रस्टी असणाऱ्या कायदे पंडितांनीही आपला संग्रह म्युझियमला दिलेला आहे. बगीचात अनेक पौर्वात्य बनावटीचे पुतळे ठेवले आहेत. वेड या शिल्पकाराने घडवलेला नेव्हल कमांडरच्या वेशातील पुतळा व त्याच्या चबुतऱ्यावर कोरलेले पायाभरणी समारंभ व मानपत्र प्रदान समारंभ हेही एक वेगळेपण आहे.

भारतीय व ब्रिटिश कला परंपरांची मांदियाळी म्हणून ही इमारत व यातील कलासंग्रह नक्कीच मुंबईकरांचा मानबिंदू ठरू शकतो.




**संगीता बेहेरे**
**(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)**
९८६७७५८३१०





# विलेपार्ल्याचा चैतन्यमय, तारुण्याने सळसळणारा असा उत्साहवर्धक ज्ञानपथ!!

पहिली ते एमबीए एवढे शिक्षण घेण्यासाठी मुलांना जिवाचा किती आटापिटा करावा लागतो हे आपल्याला माहित आहे! कुणाला आपलं उपनगर, आपलं गाव सोडून दुसऱ्या नगरामध्ये, दुसऱ्या उपनगरामध्ये जावं लागतं. कुणाला तर देश सोडून दुसऱ्या देशात जाऊन शिक्षण घ्यावं लागतं.

मात्र जगामध्ये अशी काही फार थोडी स्थळं आहेत की, तेथे अगदी पहिली ते थेट एमबीए , हे सारे शिक्षण चालण्याच्या अंतरावर मिळू शकतं! असे चमत्कार होण्याचे जगातलं एक महत्त्वाचं स्थळ म्हणजे आपलं पार्ले! मंडळी लक्षात येतंय का मी यावेळी कुठल्या मार्गाबद्दल बोलत आहे ?



एकाच मार्गावर प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, कला, शास्त्र या शाखांच महाविद्यालय, वाणिज्य महाविद्यालय, एवढेच नाही तर एम बी ए वगैरे अत्याधुनिक शिक्षण देणारी गुणवत्तापूर्ण संस्था, आणि त्यापुढे जाऊन क्रिकेट आणि फुटबॉल सारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण देण्यासाठी विस्तीर्ण मैदान, असे शिक्षण- प्रशिक्षणाचे सारे प्रकार जगामध्ये फारच थोड्या ठिकाणी एवढ्या जवळ जवळ असतील. आता तरी ओळखलत ना ?

आपल्या पार्ल्यामधील दीक्षित रोड !

मंडळी, या मार्गाचे नाव दीक्षित रोड का आहे माहित आहे का? येथे विलेपार्ल्यामधील एक मोठं समाजसेवी, सेवाभावी व्यक्तिमत्व राहायचं. श्रीमान माधवराव सदाशिवराव दीक्षित! माधवरावांचे वडील श्री सदाशिवराव सीताराम दीक्षित यांनी या मार्गावर त्यांचे घर बांधले होते. हे दीक्षित कुटुंब कर्तबगारीने फार मोठं होतं बरं का! श्री सदाशिवराव दीक्षित हे कच्छ संस्थानचे दिवाण होते, तर त्यांचे बंधू श्री हरी सीताराम दीक्षित हे मुंबईतील प्रसिद्ध सॉलिसीटर होते. त्यांचो सरकार दरबारी सुद्धा फार वजन होते.

विलेपार्ल्यात नव्याने राहायला येणाऱ्या लोकांना सुलभतेने जमिनी उपलब्ध करून देण्यासाठी जो वाडिया ट्रस्ट स्थापन करण्यात आला होता तेथे माधवराव मन लावून काम करायचे. तेथे ते व्यवस्थापक होते आणि अनेक लोकांना त्यांनी या कामासाठी तळमळीने मदत केली होती. त्याकाळी पार्ल्यामध्ये लिटररी आणि स्पोर्ट्स असोसिएशन सुरू करण्यात सुद्धा त्यांचा सिंहाचा वाटा होता.


माधवराव पुढे बंगलोरला गेले आणि व्हाईट फीड येथील सत्य साईबाबांच्या आश्रमाची ते शेवटपर्यंत व्यवस्था पाहत असत.

मंडळी, सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे,



महानगरपालिकेची दीक्षित रोड शाळा, माध्यमिक विद्यालय आणि अगदी आता कनिष्ठ महाविद्यालय सुद्धा या मार्गावरच आहे. मुलाने पहिली मध्ये प्रवेश घेतला की बारावीपर्यंत पहायला नको.

बारावीनंतरच्या शिक्षणासाठी कला आणि शास्त्र शाखेचे साठ्ये महाविद्यालय याच मार्गावर



थोडे पुढे आहे. त्यालाच लागून दोन मिनिटांच्या अंतरावर एम एल डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय आणि त्यांचेच एमबीए महाविद्यालय सुद्धा आहे. ही दोन्ही महाविद्यालये पार्ले टिळक शिक्षण संस्थेच्या अखत्यारीत येतात.

डहाणूकर कॉलेजच्या समोर जो रस्ता आहे तो




पूर्वी पार्ले टिळक असोसिएशनच्या विस्तीर्ण पटांगणाचा भाग होता. महानगरपालिकेच्या मार्ग विस्तारामध्ये त्याचा बराचसा भाग गेला. आता

पान ५ वर



# पार्ल्यातील एक थोर व्यक्तिमत्व डॉ. व. दि. कुलकर्णी

**डॉ. व.दि. कुलकर्णी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष.( जन्म २३ ऑगस्ट १९२३ व निधन २५ ऑगस्ट २००१).**



गुरुवर्य प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी हे २४ वर्षे पार्ल्यात राहिले आणि त्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात पार्ले महाविद्यालय आणि लो. सेवा संघ टिळक मंदिर येथे बहुमोल कार्य केले हे पार्ल्यातील आजच्या तरुण पिढीला ठाऊक असेल असे वाटत नाही. एखाद्या गावाची संस्कृती बहरते, फुलते ती, अशा समाजासाठी, लोकपीठासाठी तळमळीने काम करणाऱ्या व्यक्तींमुळे ! अत्यंत साधे, सौजन्यशील, शांत, सहृदयी असे आमचे सर आम्हाला परमवंदनीय आहेत.

१९५९ मध्ये पार्ले महाविद्यालय सुरू झाले आणि आपल्या पार्ले टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय मा.सी. पेंढारकर सर यांनी व.दि.ना पुण्याहून पार्ले महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून बोलावून घेतले. व.दि. त्यावेळी पुण्याला स.प. महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक होते आणि आमचे परम भाग्य म्हणून व.दि. पार्ले महाविद्यालयात आम्हाला प्राध्यापक म्हणून लाभले. व.दि.नी महाविद्यालयात उत्कृष्ट शिकवलेच पण पार्ले गावाचे सांस्कृतिक संचित वाढवण्यासाठीही भरपूर परिश्रम केले. लोकमान्य सेवा संघासारख्या संस्थांना ते लोकपीठ मानत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना साहित्याची जाण देणे, अभिरुची संपन्न करणे हे तर महत्त्वाचे आहेच पण एकूण समाजाचीही वाङ्मयीन समज जोपासली पाहिजे, उच्च अभिरुची निर्माण झाली पाहिजे असे त्यांना वाटे. पार्ले गावाला ही सांस्कृतिक पार्श्वभूमी खूप मोठी होती. मध्यमवर्गीय, सुशिक्षित, सुसंस्कृत, सुजाण वर्ग पार्ल्यात खूप मोठ्या प्रमाणात होता. उच्चमूल्ये जपणारी आणि साहित्य, संगीत इत्यादी कलांमध्ये रस घेणारी माणसे होती. लो.से. संघात विनामूल्य, तळमळीने, सेवाभावी वृत्तीने कार्य करणारे स्वयंसेवक होते. व.दि. पार्लेमहाविद्यालयापुरते राहिले नाहीत. महाविद्यालयात तर विद्यार्थ्यांसाठी अनेक वाङ्मयीन उपक्रम त्यांनी केले तसेच लो.से.संघातही अनेक साहित्यिक उपक्रम केले. अनेक उत्तम उत्तम व्याख्याने, चर्चा, परिसंवाद, मुलाखती, अभिरुपन्यायसभा इतकेच नव्हे तर एका उपनगर साहित्य संमेलनाचेही धुरीणत्व त्यांनी स्वीकारले होते. पुण्यावर नितांत प्रेम असूनही ते पार्लेकरही झाले.

लो. से. संघात १९६८ मध्ये उपनगर साहित्य संमेलन आयोजित करण्याचे ठरले. व.दि. त्याचे कार्याध्यक्ष होते. अध्यक्ष होते प्राचार्य रा.भि. जोशी. स्वागताध्यक्ष होते प्रा. गंगाधर गाडगीळ. या संमेलनात मराठी नियतकालिकांवर परिसंवाद झाला त्याचे अध्यक्ष प्रा. वा.ल. कुलकर्णी होते. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सहकार्याने मराठी नियतकालिकांचे प्रदर्शन भरवले होते. त्यात बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' पासूनची अनेक नियतकालिके मांडली होती. वसंत सरवटे यांच्या व्यंगचित्रांचेही प्रदर्शन तिथे होते. या संमेलनात 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या नाटकाचा प्रयोगही केला गेला. संमेलनाला अनेक नामवंत साहित्यिक आणि पार्ल्यातील रसिक श्रोते उपस्थित होते.

चि.त्र्यं. खानोलकर यांच्या 'कोंडुरा' कादंबरीवर पार्ल्यातील वाङ्मय प्रेमी मित्रमंडळींच्या वतीने एक अनौपचारिक चर्चा घेतली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ८०व्या जयंतीला लो.से. संघाने 'मृत्युंजय सावरकर' हे नाट्य नंदापाटकर यांनी बसवले होते. या नाटकाचे मूळ लेखन व. दि. नी केले होते. बाबूराव फणसळकरांनीही खूप परिश्रम घेतले होते. लो. से. संघात व. दि. नी व्यंकटेश माडगूळकरांची मुलाखत घेतली होती. 'वाङ्मयातील अश्लीलता' या विषयावर 'अभिरुप न्यायालया'च्या माध्यमातून एक चर्चा लो.से. संघात घेतली गेली. 'अभिरुप न्यायालय' हा प्रकारच त्यावेळी नवीन होता. पुढे तो विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट' मध्ये बघायला मिळाला. तर या अभिरुप न्यायालयात न्यायाधीश होते महाराष्ट्र राज्याचे मंत्री मधुसूदन वैराळे, सरकारी वकील, आरोपीचे वकील होते विद्याधर गोखले, धो.वि. देशपांडे, विठ्ठलराव गाडगीळ. ग.वा.बेहेरे यांनी 'सब भूमी गोपालकी' ही कथा सादर केली. या कार्यक्रमात समीक्षक म्हणून व.दिंचा सहभाग होता. श्री.ना. पेंडसे यांची 'रथचक्र' च्या निमित्ताने मुलाखत आणि चर्चा यांचे आयोजन व. दि,नी केले होते. त्यात कमलाकर सारंग, लालन सारंग, माधव वाटवे, विनया खडपेकर आणि स्वत: व. दि. ही होते. कादंबरीवरून नाटक करणे ही प्रथा त्यावेळी सुरू झाली होती. त्या संदर्भात ही चर्चा खूपच रंगली होती, त्यावेळी गाजलेली आणि आजही आवडीने वाचली जात असलेली कादंबरी म्हणजे शिवाजीराव सावंत यांची 'मृत्युंजय'. या कादंबरीवरही लो. से. संघात चर्चा आयोजित केली गेली. या चर्चेत पार्ले टिळक विद्यालयात त्यावेळी शिक्षक असलेले

पान १४ वर



पान ३ वरून

# विलेपार्ल्याचा चैतन्यमय, तारुण्याने सळसळणारा असा उत्साहवर्धक ज्ञानपथ!!

या रस्त्याच्या पलीकडे पार्ले टिळक असोसिएशनचे अजूनही आकाराने मोठे असलेली विस्तीर्ण असे मैदान आहे आणि तेथे क्रिकेट, फुटबॉल वगैरे मैदानी खेळ सतत सुरू असतात. आत्ता जिथे दीक्षित रोड आणि गुजराती सोसायटी रोड एकत्र येतात, तिथे पूर्वी 'डेड एंड' होता. तारेचे कुंपण होते आणि ते वाकवून लोक मैदान पार करून पुढे जायचे. पार्ले कॉलेज समोर एक छान बंगला अजुनही पार्ल्याच्या जुन्या काळाची साक्ष देत उभा आहे. हा विसावा बंगला परांजपे कुटुंबियांचा आहे. येथे साठ्ये महाविद्यालयात एकेकाळी रसायनशास्त्र शिकवणारे प्राध्यापक श्री परांजपे सर राहतात.

बऱ्याच लोकांना हे माहित असेल की, दीक्षित रोड हा फक्त गुजरात सोसायटी ते नेहरू रोड पर्यंतच नसून तो नेहरू रोडच्या पलीकडेही जातो. फिरोज शहा मेहता रोड, श्रद्धानंद रोड यांना पार करून, जवळजवळ, रेल्वे मार्गाला समांतर असणाऱ्या वि स खांडेकर मार्गापर्यंत जाऊन पोहोचतो!

फिरोजशहा मेहता रोड ते श्रद्धानंद रोड या दीक्षित रोडच्या भागामध्ये काही हॉटेल्स आणि जुने बंगले अजूनही आहेत.



याच परिसरात एक छोटे जैन मंदिर आणि मेलडी मातेचे मंदिरही आहे. याच्यापुढे दीक्षित रोड फारच अरुंद होतो, गल्लीच म्हणा छोटीशी. या परिसरात दीक्षित रोड कसा दिसतो हे पाहण्यासाठी सोबतचा नकाशा पहावा.

तर मंडळी, अशाप्रकारे, दीक्षित रोड हा पार्ल्याचा ज्ञानपथ आहे असं म्हटलं तर ते सयुक्तिकच ठरावं!


जेव्हा तुम्हाला थोडसं उदासवाणं वाटेल, क्वचित निराशेची छोटी किरणं मनामध्ये डोकावत असतील, इंग्रजीमध्ये सांगायचं झालं तर बोअर झाला असाल, तर एकदा दीक्षित रोड वरून फेरफटका मारून या!

पहिलीपासून ते महाविद्यालयापर्यंत, अशी तरुणाईची विविध रूपे येथे सळसळत असतात.

जाता जाता आणखी एक सांगायचं म्हणजे, बॉलीवूडची अभिनय सम्राज्ञी आणि आपली मराठमोळी माधुरी दीक्षित याच मार्गावरून बरेच वेळा साठ्ये कॉलेजमध्ये गेलेली आहे.

आम्हाला खात्री आहे की माधुरीचं नाव काढल्यामुळे काही मंडळी मुद्दाम आता या रोडवरून फेरफटका मारून येतील!!

मुला मुलींचा किलबिलाट, त्यांचे पदरव, अभ्यास- चित्रपट आणि इतर गप्पा असं सारं काही, तुमचं औदासिन्य पळवून लावणारं मटेरियल इथे उपलब्ध आहे ! तारुण्य म्हणजे साक्षात चैतन्य, आशावाद आणि उत्साह यांचं प्रतिक! दीक्षित रोडवर तुम्हाला हे दिवसभरात कोणत्याही वेळी अनुभवावयास मिळेल!



**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५

# जिवाची पार्ले नगरी

पार्लेपुराण

सुन्याचे बाबा सुद्धा सुन्या सारखे जन्मजात पार्लेकर. त्यामुळे पार्लेकरी वारसे हक्क वडिलोपार्जित मिळाला होता. सुन्याचे आजोबा गिरगांव मधल्या हेमराज वाडीतले आणि आजी आंबेवाडीतली. मग लग्न होऊन स्वस्त जागा म्हणून ते पार्ल्यात रहायला आले. सुन्याचे बाबा सांगत आणि सुन्या आ वासून ऐकत असे. सुन्याला जुन्या गोष्टी भारी आवडत. त्याकाळी म्हणे पार्ले म्हणजे मुंबईच्या बाहेर समजलं जाई. आजोबांनी पार्ल्यातली रहाती जागा केवळ पंचवीस हजारात विकत घेतली होती. हे ऐकून सुन्याचे डोळे थर्टी एम एम सिनेमाच्या पडद्या सारखे आणि तोंडाचा डब्बल आ होई. आताच्या काळात मोठाल्या फ्लॅटचा मेंटेनन्स अमेनीटीजसह पंचवीस हजारात जाईल. त्या काळी आजीच्या सांगण्यावरून आजोबांनी हे पार्ल्यात ब्लॉक घेण्याचे मोठाले धाडस केले होते. सुन्याचे बाबा सुन्याला सांगायचे आणि सुन्या आ वासून ऐकत रहायचा. बाबा सांगायचे; आम्ही लहानपणी पिक्चर बघायचं असलं आणि पैश्याची चणचण असली की लक्ष्मी टॉकीजमध्ये जायचो. (आधीच सन सीटी रे ) तिथं केवळ १ रुपया पाच पैशामध्ये

पान ८ वर









# कलासक्त नोटेशन गुरु

गुरुकुल

पॅशनेट गायक, वादक, संगीत संयोजक, संगीत तज्ज्ञ आणि नोटेशन गुरु श्री. अरविंद मुखेडकर यांचा जन्म मराठवाड्यातल्या नांदेड येथील जैन व्यापारी कुटुंबातील. वास्तविक व्यापारी आणि संगीत हे समीकरण दुर्मिळ. पण मुखेडकर यांच्या घरात संगीताचा वारसा होता. आजोबांची नाटक कंपनी होती. त्यामुळे पायपेटी वगैरे वाद्यं घरात होती. लहान असताना रांगत्या वयात हातात खेळणी नव्हेत तर वाद्य आली. त्यामुळे घरातूनच संगीताचे संस्कार मिळाले.

लातूर येथून एसएससी झाल्यानंतर ७१ साली कॉलेज करता मुंबईत आले. जैन समाजाच्या हॉस्टेलमध्ये राहात असत. लॅमिंग्टन रोड भागात बरेचसे रेकॉर्डिंग स्टुडिओज होते. गाण्याची आवड आणि आकर्षण यामुळे तेथे जाणं होत असे. रेकॉर्डिंग्ज बघायला मिळत. ऑर्केस्ट्रातही वादन करायला लागले. कॉलेजची पाच वर्षं पूर्ण होताना प्रोफेशनल कलाकार झाले होते. जवळपास सगळी वाद्यं बऱ्यापैकी वाजवू शकत असत. पुढे पुढे तर रिहर्सल्सही घ्यायला लागले. ऑर्केस्ट्रामधलं एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून मान मिळायला लागला.



शिक्षणानंतर टाइम्स ऑफ इंडियामध्ये नोकरी मिळाली. TOI मध्ये लागल्यानंतर रंगभवन मध्ये पहिल्या वर्षी ‘येरे येरे पावसा’ नावाचा स्वत:चा कार्यक्रम केला. टाळ्यांनी रंगभवन दणाणून गेलं. हा कार्यक्रम इतका यशस्वी ठरला की १९८० साली फिल्मफेअर अवॉर्ड नाईटमध्ये हाच कार्यक्रम करायला मिळाला. समोर तमाम कलाकार, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, डिस्ट्रीब्यूटर्स वगैरे फिल्म क्षेत्रातले अतिथी महारथी बसले होते. सर्वांनी जबरदस्त कौतुक केलं. अरविंदजींचं स्वप्नं म्युझिक अरेंजर व्हावं असं होतं. म्युझिक अरेंजमेंट मुळे पूर्ण गाणं सजतं, त्यामुळे तो गाण्याचा महत्त्वाचा भाग आहे. अरेंजरशिप मुळे तसंच TOI मुळे इंडस्ट्रीमधल्या कल्याणजी आनंदजी, उषाखन्ना सारख्या मोठ्या लोकांच्या ओळखी व्हायला लागल्या.

अरविंदजींनी जी डी आर्ट केलं आहे. कमर्शियल आर्टिस्ट आहेत. त्यांचं कॅलिग्राफीमध्ये स्पेशलायझेशन आहे. नोकरीत मुख्यत: ग्राफिक डिझाईनर. पूर्वी कॉम्प्युटर्स नव्हते. एकटे मुखेडकर रविवार, बुधवार, आणि शुक्रवार मनोरंजन अशा पुरवणी तयार करत असत. पूर्व नियोजन आणि कामाचा जबरदस्त झपाटा यामुळे आपलं काम संपल्यावर नवभारत टाइम्स, फेमिना, माधुरी, फिल्मफेअर इत्यादी प्रकाशनांकरता काम करत. टाइम्सचं लिंटास सारख्या मोठ्या ॲड एजन्सीपेक्षा मोठं आर्ट डिपार्टमेंट आहे. नवीन काही पब्लिकेशन किंवा लोगो बदलायचा वगैरे असल्यास लोगोसाठी अरविंदजींकडे कामं येत कारण अक्षरकारी हा अरविंदजींचा भाग होता. इंडस्ट्रीतल्या मोठमोठ्या संगीतकारांबरोबर चित्रपट संगीताची तसंच काही खासगी कामं केली. मनोहारीदां सारख्या मोठ्या म्युझिशियन्स बरोबर काम केलं.

अरविंदजी म्हणतात, गाणं असो वा कोणतीही नोकरी किंवा व्यवसाय, one has to be professional. पैसे घेतो तोच प्रोफेशनल असं नव्हे, तर ही एक वृत्ती आहे. गुण आहे. गाणं हा जर उपजीविकेचा व्यवसाय असता तर त्यांना येईल ते काम घ्यावं लागलं असतं पण अरविंदजींनी नेहमी निवडीचं स्वातंत्र्य घेतलं. त्यामुळे कायम परफेक्शनकडे लक्ष राहिलं. अनेक वादक कलाकारांना त्यांचं काम पाहून दडपण येतं. अरविंदजी कामाच्या बाबतीत कर्मठ आहेत. त्यांचं स्टेटस आहे there is no place for mistakes in music.


अरविंदजींच्या पत्नी सौ. अनघा मुखेडकर देखील जाहिरात क्षेत्रातील आहेत. जीडी आर्ट आहेत. त्यांची स्वत:ची ॲड एजन्सी आहे. नोकरी चालू असतानाही अरविंदजी घरच्या एजन्सी करिता काम करत असत. सँडोज सारख्या मल्टिनॅशनल कंपनीज त्यांचे क्लायंट्स होते. त्यामुळे रिटायर झाल्यानंतर पुढे काय हा



त्यांच्या बाबतीत प्रश्न नव्हता. नोकरीत असतानाही संगीतात होतेच नोकरीनंतरही संगीत पूर्ण वेळ चालू राहिलं. फक्त ऑफिसमध्ये जाणं बंद झालं इतकंच. तेवढा वेळ हातात मिळाला. या वेळात जास्त पैसे मिळवीन पेक्षाही जास्त अभ्यास करीन, जास्त रिसर्च करेन, हा विचार होता. आज त्यांना संगीत शिक्षण क्षेत्रात भारतातील अनेक मान्यवर युनिव्हर्सिटीज मधून M phil, PhD च्या विद्यार्थ्यांसाठी अतिथी विद्वान म्हणून मार्गदर्शन करण्यासाठी बोलावलं आहे. नोटेशनस्किल या विषयात अरविंदजींना ‘नोटेशन गुरु’ म्हणतात. त्यांनी एक दिवसाचा असा अभ्यासक्रम तयार केला आहे की How to write the notation, How to read the notation, How to read and play the notation.’ या व्यावसायिक



पान ७ वर

पान ६ वरून

# कलासक्त नोटेशन गुरु

कौशल्यावर आज त्यांचे कित्येक विद्यार्थी रिऍलिटीशोज मध्ये कार्यरत आहेत.

वास्तविक अरविंदजींनी गाण्याचं व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेलं नाही. ते म्हणतात, निरीक्षण हाच माझा गुरु. बरोबरच्या वादकांशी चर्चेतून, वाचनातून, मोठमोठ्या संगीतकारांचं निरीक्षण करून माहिती मिळवत आणि पडताळून पाहात. ते स्वत:ला भाग्यवान समजतात कारण त्यांना 'श्रीनिवास खळे' यांचा मोठा सहवास लाभला. सुरुवातीला वादक म्हणून सिंथेसायझरवर साथ. नंतर मात्र घट्ट मैत्र जुळलं. 'भेटी लागी जीवा' हे अण्णा खळेंचं गीत त्यांनी अण्णांनाच हार्मोनियमवर वाजवून दाखवलं की किती रागांच्या छटा यात घेतल्या आहेत. हे काय करून ठेवलं आहे तुम्ही!! त्यावेळेस खळेही स्वत: चकित झाले आणि कौतुकाने म्हणाले, ए, किती विचार करतोस रे तू! मीही तेवढा विचार करत नाही. असे आनंद देणारे क्षण खूप मिळाले. वेगवेगळ्या रागांमध्ये वेगळा स्वर लावण्याची सवय त्यांनी अण्णांकडून घेतली. अरविंदजी स्वत: संगीतकार आहेत. त्यांनी पाडगावकरांची अनेक गाणी संगीतबद्ध केली आहेत. ती स्टेजवर गायलीही गेली आहेत. पण नोकरीत असल्याने कुठेही नाव देता आलं नाही. रघुनंदन पणशीकर यांनी अरविंदजींनी संगीतबद्ध केलेलं एक पारंपरिक गीत गायलं आहे. काही वर्षांपूर्वी आम्ही पार्लेकर तर्फे होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचं संयोजन अरविंदजी करत. परिसरातील अनेक कलाकारांच्या करिअरची सुरुवात या कार्यक्रमांमधून झाली आहे. आजची आघाडीची गायिका वैशाली सामंत हिच्या कारकिर्दीची सुरुवातही या कार्यक्रमांतून झाली आहे.त्यावेळीअरविंदजींनी तिच्याकडून चांगली चांगली गाणी बसवून घेतली. आज २८ वर्षांनंतर अरविंदजींचं एक नवीन गीत वैशालीने गायलं आहे आणि फेसबुक, मीडियावर अरविंदजींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. आज ती मोठी



कलाकार आहे, पण आपलं नाव घेते आहे, हाच आपल्यासाठी महत्त्वाचा पुरस्कार आहे असं ते मानतात. वैशाली माडे ही सुप्रसिद्ध गायिकाही त्यांच्याकडून प्रशिक्षण घेत आहे.

'महाराष्ट्र टाइम्समध्ये' संगीत विषयावर लिहिणारं कुणी नव्हतं. मुकेश माचकर यांनी अरविंदजींना विनंती केली की तुम्ही संगीत विषयक कॉलम लिहीत चला. नुकताच कौशल इनामदार यांचा अल्बम आला होता 'गर्द निळा गगन झुला' या अल्बम वर त्यांनी 'वाळवंटातलं ओऍसीस' हा लेख लिहिला. अरविंदजींच्या लेखामुळे आपल्या पहिल्या कॅसेटचा खप वाढला याबद्दल कौशल कृतज्ञ आहेत. मटामध्ये असताना जेवढं संगीताचं काम होतं, तेवढं अरविंदजींनी केलं. रिटायर झाल्यानंतर देखील रहमान वरील सहाशे पानांच्या पुस्तकावरील समीक्षा लिहिली. सिनेम्युझिशिअन असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अशोक जगताप यांनी लिहिलेल्या 'गोल्डन एरा ऑफ हिंदी फिल्मम्युझिक' या पुस्तकाचं मराठीत भाषांतर सध्या करीत आहेत. त्यांना स्वत:ला जगातली एकमेव २५० चित्रपटांना संगीत देणारी स्त्री संगीत दिग्दर्शिका 'उषा खन्ना' यांच्यावर पुस्तक लिहायचं आहे. अशाप्रकारे रिटायरमेंट नंतर देखील कलाकारांच्या मुलाखती, कॉलम, पुस्तक भाषांतर, समीक्षण यामध्ये व्यस्त आहेत. नोकरीतली शेवटची दहा वर्ष ते 'इकॉनॉमिक टाइम्स' मध्ये होते. रोजचं काम झालं की टाइम्स म्युझिक मध्ये जाऊन बसायचे. ते म्हणतात, काम करत गेलो, शिकत गेलो त्यामुळे माझी ज्ञानाची श्रीमंती वाढली. मी ती जपतोय. ओतप्रोत शक्तिशाली वाटतंय. ज्ञान तुम्हाला आनंद देतं. गाण्यातल्या साध्या गोष्टीचं आकलन झालं तरी केवढा आनंद मिळतो. आजही ते रात्री दोन-तीन वाजेपर्यंत जागे असतात. हार्मोनियम, वाद्यं, वह्या, पुस्तकं, सगळं सामान त्या सगळ्यात व्यस्त असतात.


२००६ सालापासून नोटेशन्सची वर्कशॉप्स घ्यायला सुरुवात केली. वर्कशॉपचं नाव 'नोटेशन्स स्टेशन'. छान प्रयोग व्हायला लागले. २००७ सालापासून 'श्री अशोक पत्की' यांच्याबरोबर काम करायला सुरुवात केली. अशोकजी गाण्याचा भाग आणि अरविंदजी नोटेशन्सचा भाग घेत. हे आजतागायत सुरू आहे. वर्कशॉप करता करता स्वत:ला चॅलेंजिंग असा विचार केला, ज्यांना चांगलं दिसतंय त्यांना आपण शिकवतोय. पण आपण अंध व्यक्तीला शिकवू तेव्हा खरी कमाल. स्वत: काही



शाळांमध्ये जाऊन विनंती केली की मला शिकवायला यायचं आहे. ताडदेवची एक शाळा व्हिक्टोरिया मेमोरियल, या शाळेकडून प्रतिसाद मिळाला. तिथे सगळ्या गोष्टी संवेदनशील असतात. कर्णेंद्रियं, स्पर्शेंद्रियं यांच्या आधारे शिकवावं लागतं. त्यावर अभ्यास करून साधारण महिना दीड महिन्याने फोन केला, आता येतो तुमच्याकडे शिकवायला आणि मुलांना शिकवायला सुरुवात केली. त्या शाळेतली मुलं आज पियानो वगैरे शिकून फाईव्ह स्टार हॉटेल्स मध्ये वगैरे वाजवतात.

एका संस्थेतील जवळपास २०-२५ अंध मुलांसाठी अरविंदजी वर्कशॉप घेत असत. काही कारणाने ही ऍक्टिव्हिटी बंद पडली. पण

पान ८ वर




पान ७ वरून

# कलासक्त नोटेशन गुरु



मग शिकण्याच्या ओढीने ही मुलं घरी येऊ लागली. मुलं आली की दिवसभर त्यांच्या वाड्यातच असत. त्यांच्याकडेच जेवण वगैरे. कोविड सुरू होईपर्यंत हे सगळं चाललं. त्यांना खूप तयार केलं. त्यातल्या काही सिन्सिअर मुलींनी स्वत:ची संस्था स्थापन केली. नाव अरविंदजींचं. 'अरविंद कलायतन (blind wing)'. या साऱ्या अंध मुलींकडून खळे वगैरेंची उत्तम उत्तम गाणी बसवून घेतली. रविंद्र नाट्यमंदिर, शिवाजी मंदिर सारख्या मोठ्या व्यासपीठांवर त्यांचे कार्यक्रम घडवून आणले. त्यांच्या मागे वाजवणारे म्युझिशियन्स देखील इंडस्ट्री मधले प्रोफेशनल्स घेतले. त्यांच्या स्वत:च्या ओळखीवर तसेच महाराष्ट्र सरकार सांस्कृतिक विभागाचे कार्यक्रम मिळत. जागतिक अपंग दिनाच्या निमित्तानेही कार्यक्रम मिळत. पार्ल्यातील काही संस्थांसाठी दीनानाथ नाट्यगृह येथे कार्यक्रम केले. त्या व्यतिरिक्त 'अरविंद कलायतन' या आपल्या संस्थेतर्फे अरविंदजी आपले स्वत:चे कार्यक्रमही करतात. जसं की सहगल, राज कपूरच्या गाण्यांवर वगैरे. तिथे ते एकटेच गातात. एखादं duet असेल तर त्यांच्याकडे शिकलेल्या अंध मुली साथ देतात. अलीकडे सुप्रसिद्ध स्वर्गीय गायक मुकेश यांच्या जन्म शताब्दी निमित्त १६ ते ३०ऑक्टोबर दरम्यान पाच कार्यक्रम केले.

एखाद्या संगीतकाराला गाण्याला चाल लावायची असेल तर त्याला एकांत, शांतपणा हवा असतो. अरविंदजी एक कार्यक्रम असा करतात, पडदा उघडला की समोर ते हार्मोनियम घेऊन आहेत. पाठीमागे वाद्यवृंद आहे. पडदा उघडलाय तरी काय सादर होणार हे ठाऊक नाही. अरविंदजी श्रोत्यांकडून लिरिक्स मागवतात. सर्वांसमोर कविता वाचली जाते. संगीतबद्ध होते. तिथल्या तिथे arrange होते आणि तिथल्या तिथे सादर होते. हे सगळं श्रोत्यांशी बोलता बोलता. प्रत्येक गाण्याचा बाज वेगळा. तीन तासांत तब्बल तेरा चौदा नवीन गाणी जन्म घेतात. अस्थाई केली, अंतरा केला, की पुन्हा अस्थाईची चाल आठवणं, सगळ्या तेरा चौदा गाण्यात हे खरोखर अवघड आहे, दैवी आहे. 'कवितेचे गाणे तत्क्षणी' हे या जगावेगळ्या कार्यक्रमाचं नाव. अरविंदजी म्हणतात, ही त्यांच्या आजवरच्या साधनेची उंची आहे.

सदैव थोरा मोठ्यांमध्ये वावरलेला हा निरालस माणूस. कधीही प्रसिद्धी किंवा पैशासाठी हपापलेपण नाही. डोक्यात सदैव नवनवीन संकल्पनांचे विचार चालू असतात.

त्यांच्या येणाऱ्या नवीन प्रकल्पांसाठी मन:पूर्वक शुभेच्छा !!




अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

पान ५ वरून

# जिवाची पार्ले नगरी

स्टॉलचे तिकिट मिळायचे आणि दोन रुपयामध्ये बालकनी. तिथे कुठले चित्रपट बघितले नाहीत ते विचार. तू ऐकले सुद्धा नसतील अमजद खान हिरो असलेला लडाकू, अगदी लहान मुलांच्या (म्हणजे त्या काळी आम्हाला आवडणारा ) शेर शिवाजी, अजिंक्य देवचा डेब्यु सिनेमा सर्जा. पावसात ते लक्ष्मी थियेटर गळायचं. मग आम्ही छत्र्या उघडून बसायचो. भारी धमाल यायची. हे सांगाताना सुन्याचे बाबा त्यांच्या बालपणात पोहोचायचे आणि सुन्याकडून मोठी टाळी (हाय फाय) मागायचे. कधी कधी त्या थियेटरमध्ये उंदीर फिरायचे. खुर्चीमधल्या एकाच्या पायावरून उंदीर गेला की तो मोठ्याने ओरडायचा उंदीर आणि मग त्याच्या पुढल्या खुर्चीवर बसलेले धडाधड पाय दुमडून घ्यायचे. ते तुमचं मॅक्सीकन वेव्ह वगैरे सगळं नंतर आलेले. त्याचा खरा शोध लागला आमच्या पार्ल्यात आणि ते सुद्धा लक्ष्मी टॉकीजमध्ये. बाबा गंमतीत म्हणायचे. सुन्याला बाबाचा हाच गमतीदार स्वभाव फार आवडायचा. पैसे कधी जास्त असले (चुकून कधीतरी) तर मग आम्ही शान सिनेमा (आधीच व्यंकटेश )मध्ये जायचो. तिथं तिकिट असायचं तीन रुपये म्हणजे अंमळ महागच. तिथे इंग्रजी चित्रपट लागतं. रॉबिन हूड, बयूटीफुलपीपल, सरव्हायवल असे सुंदर चित्रपट तिथे बघितले आहेत तुझ्या आजोबांबरोबर. मग इंटरव्हलला रुपयाचा सामोसा आणि आठ आण्याचा सामोसा अशी भारी चैन. सिनेमा संपला की गोष्टी करत करत मी आणि तुझे आजोबा घरी येत असू. तुझी आजी जेवणाची पान घेऊन वाट बघत असे. हात पाय धुवून देवाच म्हणून आम्ही पानावर बसत असू आणि तिला आम्ही केलेल्या गंमती सांगत सांगत माझं जेवण चाले. ती सुद्धा तितक्याच उत्साहात त्या गंमती ऐकत असे. हे सांगाताना बाबाची नजर आजी आजोबांच्या फोटोकडे जाई. सुन्याला त्यांच्या चष्म्याआडच्या डोळ्यांत किंचित ओलसरपणा जाणवे. तो किंचित कावराबावरा होई. अश्यावेळी बाबा मोठ्याने हसत चष्मा पुसायच्या निमित्ताने डोळे पुसून घेत.सुन्या बाबाना बिलगत असे आणि बाबा त्यांच्या ऑफिस मधल्या बॅगेतून टिळक मंदिरच्या ग्रंथालयातून आणलेले फास्टरफेणेचे पुस्तक धरत. ते बघून सुन्या आनंदाने जोरजोरात ओरडून बाबाच्या मांडीवर झोपून ते पुस्तक वाचायला घेई. फास्ट फास्टर फास्टेस्ट आणि ते पुस्तक वाचता वाचता पार्ल्यातली सुन्याची ही तिसरी पिढी अलगद बाबाच्या पायावर शांत तलम निद्रेआड जाई.



सी.ए.केदार अनंत साखरदान्डे
९८३३४ ७७२३३

MAAN MANTHAAN
Call- 9152017170/9769690241
LET THE MUSIC HEAL YOUR MIND AND SOUL!




Music therapy for Psychological/ psychosomatic Disorders
Physical illnesses,
Pain Management
For Students - To improve confidence And Concentration.

ISHA SANE
Music Therapist, NLP Practitioner, Special Educator, Counselor



गुलमोहोर ट्रॅव्हल्स सुबोध म. जोशी
ए.सी. कार्स, मिनी, सेमी लक्झरी बसेस भाड्याने उपलब्ध.
हॉटेल बुकींग • सीट बुकींग • पॅकेज टूर्स
9869002219
9769008775
9869376515
gulmohortravels@gmail.com • www.gulmohortravels.com
Facebook / Instagram / Youtube

सुबोध टाईपरायटर्स
कॉम्प्युटर टायपिंग ( DTP )
इंग्लीश, मराठी, हिंदी, गुजराती टायपिंग
झेरॉक्स, स्क्रीन प्रिंटींग, ऑफसेट, फ्लेक्स
02226147888 / 20151550
Email : subodhjoshi80@gmail.com

२,गगनगिरी अपार्टमेंट,पार्लेश्वर रोड,विलेपार्ले(पूर्व),मुंबई-५७.

| दिनांक | सहलीचे ठिकाण |
|---|---|
| १ ते ४ डिसेंबर २०२२ | पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर, सिध्देश्वर |
| ९ ते ११ डिसेंबर २०२२ | सापूतारा, वणी, शबरीधाम, पंपासरोवर, रोप वे, बोटींगसह |
| १८ डिसेंबर २०२२ | हुरडा पार्टी – संकल्प गार्डन, आळंदी |
| २४ ते २५ डिसेंबर २०२२ | हुरडा पार्टी – आरोह सृष्टी, मोराची चिंचोली, देहू गाथा मंदीर, राजगुरु वाडा, मस्तानी समाधी, रांजणगांव गणपती |
| ३१ डिसेंबर २०२२ ते १ जानेवारी २०२३ | हुरडा पार्टी – सासवड, बोरकर फार्मस, हिडन ओयासिस, नारायणपूर – एकमुखी दत्त, केतकावळे – प्रति बालाजी. |

२०२३ च्या सहलींसाठी सुबोध जोशी 9769008775 किंवा
सचिन जोशी 9869376515 यांच्या Whatsapp नंबरवर संपर्क साधावा

# रंगुनी रागांत साऱ्या

## तोडीची गोडी

तोडी हा एक भक्ती रस पूर्ण, अतिशय लोकप्रिय असा संपूर्ण राग आहे. तो ईश्वराच्या चरणी सकाळी गायला जातो. बऱ्याच मैफिली या रागाने सुरू होतात. अलौकिक भक्तिरस अनुभवायचा असेल तर एकदा 'पुण्य पर उपकार पाप हे परपीडा' ऐकाच. तोडी रागांगाचे, थाटाचे खूप प्रकार आहेत. त्यात जास्त लोकप्रिय मियाँकी तोडी. इतर प्रकार म्हणजे अबीरी तोडी, गुजरी तोडी, बिलासखानी तोडी, देसी तोडी, हुसेनी तोडी आसावरी तोडी (कोमल रिषभ आसावरी), आणि बहादुरी तोडी.

माझ्यासारखीच बऱ्याच लोकांची तोडी या रागाची ओळख लहानपणीच आपल्या लाडक्या पु. ल. देशपांड्यांमुळे झाली. त्या काळी दूरदर्शनवर त्यांचा एक पेटी वादनाचा कार्यक्रम झाला. पु. ल. इतका हरहुन्नरी माणूस दुसरा कोणी नसेल. त्यांनी एक सुंदर सुरावट पेटीवर वाजवली आणि सांगितलं हा राग तोडी. तेव्हापासून त्या द्रुत तोडीचे सूर जे कानात घट्ट बसले ते कायम. मोठं झाल्यावर कळलं कि ती सुरावट ही खरी एक चीझ होती. पुढे थोडा रस निर्माण झाल्यावर ते भीमसेनजींचे 'लंगर कांकरिया जिन मारो' द्रुत आवडून गेलं. सुरांना शब्द मिळाले. विलंबित 'चंगे नैनोवालिया' आणि द्रुत 'भवानी जगत जननी' मनात घुमू लागले आणि हा राग जगात भारी असल्याची खात्रीच पटली. मग इतरही चीजा ऐकण्यात आल्या. 'एरी माई आज शुभमंगल गाओ' ऐकून अनेक सकाळी शुचिर्भूत झाल्या. या रागात जेवढे भांडार अभिजात संगीतात आहे तेवढं चित्रपटात नाही. प्रत्येक प्रतिथयश गायकाने या रागात गाऊन स्वत:चे स्थान अधिक उंच नेलंय.

एकदा किशोरी ताईंचे विलंबित 'मेरे मन याहू' आणि मग द्रुत 'बेगुन गुनगाये' हेडफोन लावून ऐका, शास्त्रीय संगीत आवडत नसले तरी हा अनुभव जन्मात विसरणार नाही याची खात्री देतो.

हा राग आपल्या संस्कृतीचे सुंदर उदाहरण आहे. एक प्रसिद्ध चीझ आहे, राशिदखानांची विलंबित 'अब मोरे राम' ऐकून आपण तृप्त होतोय तेवढ्यात द्रुत मध्ये 'अब मोरी नैय्या पार करोगे हजरत निजामुद्दीन' अशी आळवणी. सर्व धर्म समभावाचे इतके चपखल उदाहरण मी पाहिलेले नाही.

गुजरी तोडीतील 'बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल' ऐकून कोणीही विठ्ठलाशी तादात्म्य पावेलच.

मंगेशकर घराण्याचे या रागावर प्रेम. चित्रपटात विशेष न वापरला गेला म्हणून असंख्य संतवाणी गाण्यात दिसतो.

'अगा करुणाकरा',

'अरे अरे ज्ञाना झालासी पावन',

'नंद नंदन दिटपडियामाये सावरो सावरो'

हृदयनाथ मंगेशकर यांच्या 'लेकिन' चित्रपटात या रागांगातील दोन गाणी आहेत. जाणकारांना अजून लक्षात असतील. बिलासखानी तोडीतील 'झुठे नैना बोले साची बतियां' आणि गुजरी तोडीतील 'जा जा रे जारे पथिकवा'. आशा भोसलेनी गायलेलं गुलझार, RD, यांचे 'भीनी भिनी भोर आई' हे याच रागातले.

अर्थात सगळ्यात लोकप्रिय आणि अमर गाणे मात्र RD बर्मन यांनी दिलेले अमर प्रेम मधील 'रैना बीती जाये'.

अभिजात संगीतात रुचीअसणाऱ्यांना तोडीची गोडी लागली कि उतरतच नाही. पण चित्रपट संगीतात लोकप्रिय नसल्याने कदाचित लोकांना त्याचे एवढे महत्व वाटतं नसावं. असो



**मिलिंद जोशी**
**९८१९७ ९७२५८**

# पंखांना मोकळे आकाश

कॅलिफोर्नियाच्या बे एरियात बायोटेक्नॉलॉजी हब आहे. येथे 'विश्वचि माझे घर' असेच भासते कारण आफ्रिकेपासून ऑस्ट्रेलियापर्यंतचे तरुण-तरुणी येथे संशोधनात मग्न असतात. तिथल्याच औषध कंपनीत विलेपार्ल्याची लक्ष्मी मिलिंद प्रभू काम करते. कर्करोगांवरील नवनवी औषधे शोधण्याचे काम येथे अव्याहत चालू असते. त्याची पहिली पायरी म्हणजे एखादा पदार्थ विशिष्ट कर्करोगावर उपयुक्त ठरतो का हे तपासणे. कधीकधी पुष्कळ मेहनत करूनही



हाती काहीच लागत नाही तर कधीकधी अचानक 'युरेका' 'युरेका'असे होते. एखादा पदार्थ विशिष्ट कर्करोगावर उपयुक्त ठरेल असा हिरवा कंदिल यांच्याकडून मिळाला की मगच गाडी पुढे जाते.

लक्ष्मी मध्यमवर्गीय कुटुंबातली, एकुलती एकलेक असली तरी तिची आवड आणि तिच्या क्षमता यावर आईवडिलांचं लक्ष होतं. तुला जे आवडेल ते कर, आम्ही तुझ्या पाठीशी आहोत हा विश्वास त्यांनी तिला दिला. आपल्याला अभ्यास करायला , प्रश्नाच्या मुळाशी जायला आवडतं हे तिला जाणवत होतं. मग बायोटेक्नॉलॉजीत बीएससी नंतर लॅबोरेटरी मेडिसीनच्या डिप्लोमासह लक्ष्मी अमेरिकेत पोचली.

सॅन डिएॅगो युनिव्हर्सिटीत तिनं 'सेल आणि मोलेक्युलर बायॉलॉजी' मध्ये थिसीसच्या माध्यमातून मास्टर्स केलं. तेव्हाच तिला संशोधनाची एवढी गोडी लागली की तिनं पीएचडी करायचं ठरवलं. पीएचडीचा अभ्यास म्हणजे मास्टर्सच्या पदवीपुढे आणखी पाच- सात वर्षे अभ्यास. तिशीपर्यंत अभ्यासासाठी त्या विषयाची प्रचंड आवड आणि प्रचंड चिकाटी लागते. घरी तुम्ही लगेच कमावलं नाही तरी चालेल अशी परिस्थिती असावी लागते. त्यानंतर पीएचडी करून बाहेर पडणाऱ्याह व्यक्तीकडे बचतही कमीच असते. कामाचे खतरनाक तास आणि अपेक्षाचं भरपूर ओझं. यातून पार पडल्यावर गाठीला ज्ञान असतं पण प्रत्यक्ष अनुभव नसतो. परंतु, पुढे नोकरीत तो मिळतोच, शिवाय वरच्या पदावर जाताना पीएचडी पदवी मोठाच ॲसेट ठरते.

पीएचडीसाठी लक्ष्मीने 'कर्करोगावरील औषधे' हा विषय निवडला. सध्या ती एका प्रथितयश औषध कंपनीत काम करते. तिच्या गटाने हल्लीच स्तनांच्या कर्करोगासाठी एक प्रभावी औषध शोधूनही काढलं आहे. अमेरिकेत ग्रीन कार्ड चटकन मिळत नाही असं म्हणतात पण



लक्ष्मीला तेही लगेच मिळाले. यावरून तिच्या कामाचं महत्व लक्षात यावं.

लक्ष्मीचा नवरा अदनान गोपीनाथनही पीएचडी करत आहे. तो तिला विद्यापीठातच भेटला. शिक्षण संपलं की विद्यापीठात शिकवायची करियर तो करू इच्छितो. एकाच क्षेत्रातील लोकांनी लग्ने केली तर ते एकमेकांना चांगले समजून घेऊ शकतात. तसंच या नव्या तरुणांच्या जबाबदाऱ्या आणि ताण किती वेगवेगळे असतात तेही आपल्या लक्षात येतं.

लक्ष्मीच्या करियरची आत्ताशी सुरुवात आहे. सुरुवातीपासूनच विचार स्पष्ट असले, घरच्यांचीही साथ मिळाली की माणूस खूप उंचीवर जाऊ शकतो हे मात्र नक्कीच.



**सविता दामले**
**९९३०३ ११५४६**

# चित्रकला हाच ध्यास

विलेपार्ले येथील रहिवासी चित्रकार श्री. प्रसाद वसंत माने हे चित्रकला क्षेत्रा मध्ये गेले २२ पेक्षा जास्त वर्षे कार्यरत आहेत. प्रसादना शाळेत असल्यापासूनच चित्रकलेची खुप आवड होती. त्यांनी चित्रकलेतील आपले पुढचे शिक्षण मुंबईच्या सर जे जे कला महाविद्यालयामधून पूर्ण



केले. विलेपार्ले पश्चिम येथील सीएनएमएस शाळेत ते चित्रकला शिक्षक म्हणून गेली १८ वर्षे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना कलेचे शिक्षण आणि प्रोत्साहन देत असतानाच त्यांनी आपले कला क्षेत्रातील कार्य सुद्धा सतत चालू ठेवले आहे. मुंबईच्या सुप्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरी सहित अनेक कला प्रदर्शने मुंबई, पुणे, नाशिक, जयपूर या ठिकाणी त्यांनी भरवली आहेत. तसेच जकार्ता, इंडोनेशिया इथेही त्यांच्या चित्रांचे ऑनलाईन प्रदर्शन झाले आहे. त्यांच्या प्रत्येक प्रदर्शनाला अत्यंत उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. त्यांच्या आतापर्यंतच्या कारकीर्दीत त्यांना अनेक सन्मानांनी पुरस्कृत करण्यात आले आहे. जर्मनी या देशाने सुद्धा त्यांच्या अप्रतिम चित्रकलेची कदर करत त्यांच्या Palm Art Award ने पुरस्कृत केले आहे.

प्रसाद माने यांना नुकताच पुण्यातील आर्ट बिटस् महाराष्ट्र 'कला सन्मान' हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. 'चित्रकला' या कला विभागात हा राज्यस्तरीय पुरस्कार असून आर्ट बिटस् फौंडेशन, पुणे कडून कलाकारांना सन्मानित करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारामुळे चित्रकार प्रसाद माने यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

या पुरस्काराची माहिती देतांना आर्ट बिटस् पुणे या संस्थेचे संस्थापक, संचालक संतोष पांचाळ म्हणाले की एकूण सहा कला विभागात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात, त्यासाठी १५ मे ते ३१ जुलै दरम्यान महाराष्ट्रातून अनेक कलाकार दरवर्षी आपली माहिती पाठवतात. त्यातून विशेष कामाची दखल घेऊन ही निवड करण्यात येते. आर्ट बिटस् ही संस्था गेली एकवीस वर्षे सातत्याने चित्र, शिल्प, संगीत, अभिनय, नृत्य आणि लोककला अशा सर्व विभागातील कला कलाक्षेत्रातील कलाकारांना सक्षम व्यासपीठ व प्रोत्साहन देण्यासाठी काम करीत आहे.

या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तळागाळातील कलाकारांसाठी महाराष्ट्रातील सर्वात मोठा डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे. यासाठी सर्व स्तरातील कलाकारांनी या संस्थेकडे संपर्क साधावा असे आवाहन आर्ट बिटस् फौंडेशन या संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# लीमरच्या देशात

देशोदेशी


युरोपचं आधुनिक जग थोड्या काळाकरिता सोडून आज आपण जाणार आहोत मादागास्करच्या जंगलात. मादागास्करला जायचं बरेच दिवस डोक्यात होतं पण मध्येच आलेल्या कोव्हिडच्या साथीने दोन वर्ष माझे सर्व प्रवासाचे बेत उधळून टाकले. त्यामुळे कोव्हिडची टाळेबंदी संपल्यावर पहिली संधी मिळाली तशी मी अंतानानारिव्होची (मादागास्करची राजधानी) फ्लाईट पकडली. कारण मादागास्कर बेट ही एकमेवाद्वितीय अशी जागा आहे.

भूगर्भ शास्त्रज्ञांच्या मतानुसार, सुमारे १८-२० कोटी वर्षांपूर्वी गोंडवन ह्या महाखंडाचे तुकडे व्हायला सुरुवात झाली - त्यातूनंच आजचे आफ्रिका, अण्टार्क्टिका, ऑस्ट्रेलिया आणि भारतीय उपखंड असे तुकडे वेगवेगळे निघाले. सुमारे ८-९ कोटी वर्षांपूर्वी मादागास्कर बेट भारतीय उपखंडापासून तुटून वेगळं झालं आणि आजपर्यंत एव्हढा दीर्घ काळ जगातील सर्व प्रमुख भूखंडांपासून विलग राहिल्यामुळे मादागास्कर मधील जीवनाची उत्क्रांती पूर्णपणे वेगळ्या वाटेने होत राहिली. समुद्रातून वाहून योगायोगाने मादागास्करला जी काही जीवन बीजे जगाच्या इतर भागातून पोचली असतील आणि त्यांचा स्थानिक जीवनाबरोबर संकर होऊन जे काही आनुवंशिक (Genetic) साधर्म्य मादागास्कर आणि इतर जगातील संबंधित प्रजातींमध्ये निर्माण झालं असेल तेव्हढंच. त्यामुळे मादागास्कर मधील ८५% वनस्पती आणि प्राणी दोहोंच्या प्रजाती जगात इतरत्र कुठेही आढळत नाहीत. म्हणूनच मादागास्करच्या जंगलातून आणि दऱ्याखोऱ्यातून फिरणे हा एक अद्वितीय अनुभव आहे - झाडं, पानं, फुलं, कीटक, जलचर, वनचर सर्व काही पूर्वी कधीही न पाहिलेलं!

'लीमर' (Lemur) हा ही त्यातलाच एक प्राणी - जगात कुठेही न आढळणारा. लीमर हा Primate (ज्यामध्ये माकड, वानर, गोरिला, लोरीस ह्यासारखे प्राणी आणि मानव सुद्धा समाविष्ट आहेत) ह्या गटात मोडणारा प्राणी आहे. मात्र लीमर आणि माकडं ह्यांच्या दिसण्यात आणि वागण्यात साम्य आढळलं तरी लीमर म्हणजे माकड नव्हे. जीवशास्त्रानुसार माकड, एप, माणूस वगैरे प्राण्यांचा सिमियन गटात समावेश होतो तर लीमर हा स्ट्रेपसिन्हीनी गटात मोडतो. सुमारे ६-७ कोटी वर्षांपूर्वी ह्या आज आढळणाऱ्या प्राण्यांच्या (मानवसकट) वंशवेली कुठल्यातरी समाईक पूर्वजापासून वेगवेगळ्या झाल्या असाव्यात आणि त्याच सुमारास भूगर्भातील उलथापालथीमुळे विलगलेल्या मादागास्करवर अडकलेल्या ह्या पूर्वजांची पुढच्या उत्क्रांतीची वाटचाल आपल्या भाऊबंदांपेक्षा वेगळ्या वाटेने होऊन त्याची परिणीती आज दिसणाऱ्या लीमरमध्ये झाली असावी.

अर्थात गेल्या चार-सहा वर्षांपर्यंत फक्त निसर्गप्रेमी वर्तुळातच माहिती असणाऱ्या मादागास्करचा जगभर अचानक बोलबाला झाला तो 'मादागास्कर' नावाचा कार्टून सिनेमा सर्वत्र गाजल्यामुळे. तसंच त्यातील किंग जुलिअन ह्या चटकन प्रेमात पडावे अश्या Ring-Tailed जातीच्या लीमर पात्रामुळे लीमर बद्दलही अचानक जगभर कुतूहल निर्माण झालं. (पहा पहिला फोटो).

अर्थात सिनेमातले आणि प्रत्यक्षातले लीमर ह्यांच्यात जमीन अस्मानाचा फरक आहे. लीमरच्या जाती-पातीत दिसण्या / वागण्यात, सामाजिक व्यवहारांत, खाण्यापिण्यात, वसतीक्षेत्रांत किती विलक्षण वैविध्य आहे हे मला



मादागास्करला जाईपर्यंत अजिबात माहिती नव्हतं.

लीमरच्या प्रजातीच १००च्या वर आहेत. त्यात निशाचर जाती आहेत, दिनचरही आहेत, एकपत्नीव्रती आहेत तसेच मोठा जनानखाना बाळगणाऱ्या आहेत, मांसाहारी आहेत तश्याच संपूर्ण शाकाहारी आहेत, आणि शाकाहारी जातींतही फक्त पानं किंवा फक्त फळं किंवा फक्त झाडाचा चीक खाणाऱ्यासुद्धा आहेत, कधीच पाणी न पिणाऱ्या आहेत, जमिनीवर भटकणाऱ्या आहेत, वृक्षांच्या शेंड्यावरच कायम वास्तव्य करणाऱ्याही आहेत! आकारानेही तुमच्या तळहातावर बसू शकतील अश्या केवळ ३०-४० ग्राम वजनाच्या निशाचर Mouse-



Lemur (दुसरा फोटो) पासून ते १०-१२



किलो वजनाच्या Indri पर्यंत (तिसरा फोटो)!

बहुतेक जातीमध्ये लीमर मोठ्या टोळ्या न करता घट्ट नातेसंबंधाने बांधलेल्या एकत्र कुटुंबात राहातात. अर्थात त्यालाही अपवाद आहेतच. Red-Tailed Sportive हा निशाचर एक पत्नीव्रती लीमर एकांडा शिलेदार आहे. पती पत्नी एकाच परिसरात पण पूर्ण स्वतंत्र आयुष्य जगतात - प्रजननासाठी काय संबंध येईल तेव्हढाच.

बहुतेक सर्व जाती आपापल्या ठराविक क्षेत्रातच संपूर्ण आयुष्य घालवितात. मजा म्हणजे वेगवेगळ्या जातीच्या टोळ्या एकाच क्षेत्रात गुण्यागोविंदाने नांदतात - कदाचित प्रत्येकाचं खाणं वेगवेगळं असल्यामुळे, अन्न आणि प्रजनन दोहोंसाठी भिन्न जातीत स्पर्धा होत नसणार. मात्र एकाच जातीच्या दोन टोळ्या एक दुसऱ्याच्या मुलुखात घुसल्या तर मारामाऱ्याही होतात. पण त्याही बेताबेतानेच. आम्ही किरिंडी गावाजवळच्या अरण्यात फिरताना अश्याच White Sifaka (चौथा फोटो) जातीच्या दोन टोळ्यांची बाचाबाची योगायोगानं आमच्या डोक्यावरच्या झाडातच सुरु झालेली पाहायला मिळाली. पण दहा-पाच थपडा



एकमेकाला मारून दोन्ही टोळ्यांनी आपापल्या सीमेत माघार घेतली! पण त्याच रणांगणाच्या केवळ एक फूट खालच्या फांदीवर दोन Red Fronted Brown लीमर (पाचवा फोटो) शांतपणे बसून वर चालेल्या मारामारीची मजा बघत होते!




सकाळी अँडासिबेच्या हिरव्यागार ट्रॉपिकल जंगलात शिरताना पावसाचा थोडासा सुखद शिडकावा झाला आणि नंतर सूर्य वर आला तरी आजूबाजूच्या दाट वनराईच्या शेंड्यांवर धुक्याची दुलई अजून होती. त्यामुळे आम्ही जरा काळजीतच होतो कारण आम्ही होतो Indri आणि Golden Sifaka च्या मागावर. हे दोन्ही लीमर क्वचितच जमिनीवर उतरतात. त्यांचं कायम वास्तव्य झाडांच्या शेंड्यावरच, ५०-६० फूट उंचीवर. तेव्हढ्यात आम्हाला ऐकू आलं उच्चरवात चाललेलं Indri चं गाणं - Indri च्या ह्या संगीतात आणि देवमाश्याच्या ललकारीत कमालीचं साम्य आहे आणि आवाजाचा माग काढीत जरासं पुढे गेल्यावर दिसली सकाळच्या न्याहारीत मग्न असलेली त्यांची टोळी. त्यांचे फोटो काढत होतो तेव्हढ्यात आमच्या वाटाड्याचा एका मित्राने Golden Siefeakea दिसल्याची खबर आणली. आजूबाजूच्या Peandeanus ह्या राक्षसी (२०-२५ फूट उंच) कोरफडी सारख्या झाडाची तलवारीसारखी पाती बाजूला सारत अर्धा-एक किलोमीटर पुढे गेल्यावर झालं एकदाचं ह्या सोनेरी/नारिंगी रंगात उन्हात चमकणाऱ्या देखण्या Golden Sifaka चं दर्शन (सहावा फोटो).



अँडासिबेच्या जंगलात जरी दिनचरलीमरच्या अनेक जाती दिसल्या असल्या तरी, रात्री बराच काळ झाडा-झुडुपांना ठेचकाळत फिरूनही निशाचरांचं दर्शन मात्र झालं नव्हतं. तो योग आला किरिंडीच्या Deciduous (पानगळ होणारी, कोरड्या प्रदेशातील वनराजी) जंगलात. रात्री-बेरात्री फिरायला मादागास्करच्या जंगलांत अजिबात कसलाही धोका नसतो कारण मादागास्कर मध्ये कुठेच वाघ/सिंहच काय पण लांडग्यासारखेही शिकारी प्राणी नाहीत. तिथला प्रमुख शिकारी प्राणी आहे फूसा, पण तो मुंगुसापेक्षा थोडासा मोठा असतो आणि माणसाच्या वाटेला सहसा जात नाही. हिंसक प्राण्यांच्या हल्ल्यापेक्षाही जास्त धोका इथे रात्र-बेरात्री जंगलात फिरण्यात असतो वाट चुकण्याचा. त्यामुळे स्थानिक माहितगार वाटाड्याला बरोबर घेणं मात्र आवश्यक. किरिंडीला रात्री भटकताना आमच्या वाटाड्याला त्या डोळ्यात बोट घातलं तरी काहीही न दिसावं अश्या अंधारात कुठल्या झाडावर कोण लीमर बसला आहे हे कसं अचूक कळत होतं कोणाला ठाऊक. पण अचानक आपल्या बॅटरीचा झोत टाकून त्याने सहसा दुर्मिळ असा श्दले लीमर सुद्धा आम्हाला दाखविला.

असो. पाहिलेल्या सर्वच लीमर जातींचं आणि मादागास्कर मधल्या सर्वच निसर्गाच्या चमत्कारांचं वर्णन शब्दमर्यादेमुळे इथे करणं शक्य नाही. पण त्यातील सिंगी (Tsingi) ह्या विलक्षण जागेची तोंडओळख पुढच्या लेखात.



सतीश जोशी
९८२०२२८२७९

## प्रdha Art Studio च्या उद्घाटनासाठी विशेष पाहुण्यांची उपस्थिती

कला आणि कलाकारांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन जरी कायमच सन्मानाचा असला तरी त्या कलेचं व्यवसायात रुपांतर करतांना कलेचं योग्य ते मूल्यमापन होईलच असं नाही. त्यांसाठी कलाकारांनीच आपली कला समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचं विचारातून शिल्पा आपटे आणि मेधा गलगले यांनी सुरु केलेल्या प्रhea या कलावस्तूंच्या brand ला लोकांपर्यंत पोहोचविण्याचा यशस्वी प्रयत्न तर केलाच पण त्यासोबतच त्यांनी आता एक पुढचं पाऊल उचललं आहे ते म्हणजे, पार्ले येथे आर्ट स्टुडिओची निर्मिती.

सुप्रसिद्ध अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी-मोने यांच्या हस्ते हल्लीच या स्टुडिओचं उद्घाटन झालं. या प्रसंगी मेधा आणि शिल्पाचं अभिनंदन करतांना सुकन्या म्हणाल्या, ' शिल्पा आणि मेधा या दोघींनी आपल्याकडील कला लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या ध्यासातून जे यश मिळवलंय ते फक्त स्तुत्यच आहे असं नाही तर त्यांच्या कलावस्तूंचा दर्जा आणि उपयुक्तता बघता त्याला लोकाश्रय मिळणंही तितकच अपरिहार्य आहे.'

शिल्पा आणि मेधा यांनी घडविलेल्या वस्तू लोकांना बघण्यासाठी तसेच विक्रीसाठी त्यांच्या स्टुडीओमध्ये उपलब्ध केल्या आहेत. खाली दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावर त्यांच्याशी संपर्क साधावा.



## शुभदा पिंगे यांना सहचारिणी पुरस्कार

सुप्रसिद्ध साहित्यिक कै. रवींद्र पिंगे यांच्या पत्नी श्रीमती शुभदा पिंगे यांना मुंबई मराठी साहित्य संघातर्फे देण्यात येणारा 'सहचारिणी' पुरस्कार प्रदान करण्यात आला. साहित्य संघाच्या ८७ वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ वैज्ञानिक मा. डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

दीर्घकाळ साहित्यसेवा करणाऱ्या रवींद्र पिंगे यांचे साहित्य संघाशी जवळचे संबंध होते. त्यांच्या यशस्वी वाटचालीत पत्नीची खंबीर साथ लाभली. या सहकार्याची दखल घेऊन शुभदाताईंना सन्मानित करणे हे अतिशय औचित्यपूर्ण होते. शाल, श्रीफळ, मानपत्र व दहा हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप होते.




विज्ञान क्षेत्रातील बहुमोल कर्तृत्वासाठी मा. डॉ. अनिल काकोडकर यांना 'मराठी यशवंत' या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य संघाच्या अध्यक्षा व ज्येष्ठ लेखिका श्रीमती अचला जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ग्रामीण साहित्य, संत साहित्य, बालसाहित्य, कथा, वैचारीक लेखन याचबरोबर नाट्य, प्रकाशन, भाषासंवर्धन या क्षेत्रातील भरीव कामगिरी करणाऱ्यांना या वेळी गौरवण्यात आले. चंद्रकांत कुलकर्णी, अशोक बेंडखळे, मोनिका गजेंद्रगडकर, रेखा नार्वेकर अशा मान्यवरांची कार्यक्रमाला उपस्थिती लाभली. शनिवार दि. २९ ऑक्टोबर रोजी साहित्य संघाच्या डॉ. अ.ना. भालेराव सभागृहात हा दिमाखदार सोहळा सम्पन्न आला.

## मन कस्तुरी रे




'ती सध्या काय करते', 'रंपाट', 'अशी ही आशिकी' अशा चित्रपटातून लोकप्रिय झालेला अभिनेता म्हणजे अभिनय बेर्डे. नोव्हेंबर महिन्यात अभिनयची प्रमुख भूमिका असणारा 'मन कस्तुरी रे' हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. तरुण पिढीला आवडेल असं या चित्रपटाचं कथानक आहे. प्रत्येक तरुणाचं काही ना काही स्वप्न असतं. असाच एक तरुण म्हणजे सिद्धांत (अभिनय बेर्डे). एम. बी. ए. करावं, चांगली नोकरी करावी असं त्याचं स्वप्न आहे. आपल्या आईवर त्याचे जीवापाड प्रेम आहे. कॉलेजमध्ये शिक्षण घेत, घरखर्चासाठी नोकरी करून सर्वसामान्य आयुष्य जगणाऱ्या सिद्धांतच्या आयुष्यात श्रुती ( तेजस्वी प्रकाश) येते आणि त्याचे पूर्ण आयुष्यच बदलते. श्रुती आणि सिद्धांत एकमेकांवर जीवापाड प्रेम करतात. पण मग त्या दोघांच्या आयुष्यात असे काय घडते की त्यांच्या प्रेमाला नजर लागते.

चित्रपटाचे ट्रेलर पाहताना तुमच्या नक्कीच लक्षात येईल की या चित्रपटात भरपूर सस्पेन्स आणि ट्विस्ट पाहायला मिळत असून एकमेकांसाठीचा द्वेष, सूडभावनाही यात दिसत आहे. त्यांचे प्रेम एवढ्या टोकाला का पोहोचते, हे आपल्याला चित्रपट पाहिल्यावरच कळेल.

संकेत माने दिग्दर्शित 'मन कस्तुरी रे' येत्या ४ नोव्हेंबर रोजी सिनेमागृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नितीनकेणी यांच्या नेतृत्वाखाली, मुंबई मुव्ही स्टुडिओज प्रस्तुत, व्यंकट अत्तिली, मृत्यूंजयकिचंबरे यांच्या इमेन्स डायमेंशन एन्टरटेनमेंट ॲण्ड आर्ट्स निर्मित या चित्रपटाचे सहनिर्माते ड्रॅगन वॉटर फिल्म्सचे निशीता केणी आणि करण कोंडे आहेत. वितरणाचे काम युएफओ सिनेमीडिया नेटवर्क करणार असून संगीत प्रदर्शनाची धुरा टिप्सने सांभाळली आहे. नितीनकेणी यांनी यापूर्वी 'सैराट'सह अनेक सुपरहिट चित्रपटांच्या निर्मितीची धुरा सांभाळली असून 'मन कस्तुरीरे' चे प्रस्तुतकर्ता आहेत.या चित्रपटात अभिनय बेर्डे आणि तेजस्वी प्रकाश यांच्यासह राजश्री देशपांडे, वीणा जामकर, किरण तांबे, तुषार घाडीगावकर यांच्याही भूमिका आहेत. या चित्रपटाची गाणी देखील लोकप्रिय होतआहेत.

**मनोरंजन विश्व**

## प्रेम प्रथा धुमशान

कोकण प्रांतात विविध गावात विविध प्रथा आहेत आणि त्या अजूनही पाळल्या जातात. सिंधुदुर्गात गावपळण ही अनोखी प्रथा पाळली जाते. गावपळण प्रथा पाळणाऱ्या गावातील ग्रामस्थ एका ठरावीक काळासाठी गाव सोडून दुसरीकडे राहायला जातात . या प्रथेबरोबरच एक प्रेमकथा गुंफून 'प्रेम प्रथा धुमशान' हा चित्रपट तयार झाला आहे. मात्र या प्रेमकथेला विरोधाची किनार आहे. याप्रेमकथेत संघर्ष, विरोध आहे, श्रद्धा-अंधश्रद्धेचा झगडा असं सारं काही यात पाहायला मिळणार आहे . सिंधुदुर्गातली गावपळणीची अनोखी प्रथा आणि त्या दरम्यानची थरारक प्रेमकथा आता या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येत आहे.




ऑक्सिजन फिल्म्स, डायनॅमिक पिक्चर्स, आरव्हीके फिल्म्स यांनी 'प्रेम, प्रथा धुमशान' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सत्या अय्यर हे चित्रपटाचे निर्माते, तर स्वरा अभिजीत वारंग, रचना विज, मोहित, नमन तलवार सहनिर्माते आहेत. अभिजीत मोहन वारंग यांच्या 'पिकासो' या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. महाराष्ट्राची हास्यजत्राफेम शिवाली परबसह विनायक चव्हाण, अभय खडपकर, अभय नेवगी, मिलिंद गुरव, विश्वजित पालव, विद्याधर कार्लेकर, निकिता सावंत, कल्पना बांदेकर असे नामवंत कलाकार या चित्रपटात आहेत.चेतन शिंदे यांनी छायांकन, आनंद लुंकडयांनी संगीत दिग्दर्शन केलं आहे.



गणेश आचवल
९८२१२६८३९१

# प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल - एक दूरदर्शी वाटचाल

भारतात क्रिकेट हा धर्म आहे आणि सतत चालू असलेल्या विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धा किंवा आयपीएल मुळे या धर्माचे पालन भारतीय कसोशीने करत असतात. गेल्या काही वर्षात मात्र या क्रिकेट धर्मापासून वेगळे होत अनेक इतर खेळ लोकप्रिय व्हायला लागले आहेत. हॉकी, बॅडमिंटन, धावपटू बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग भालाफेक ते अगदी फेन्सिंगपर्यंत आपले खेळाडू ऑलंपिक स्तरावर नुसते प्रतिनिधित्वच करायला लागले नाहीत तर अगदी सुवर्णपदक पर्यंत मजल मारत आहेत. हे सर्व क्रिकेटेतर खेळ भारतात होतेच पण त्यांची आवड निर्माण होऊन



त्यातच कारकीर्द घडवायची स्वप्ने भारतातील खेळाडू पाहू शकत नव्हते, याला कारण म्हणजे त्या खेळांसाठी लागणाऱ्यापायभूत सुविधा. जसंपु.ल म्हणतात 'मुंबईच्या चाळीच्या गॅलरीत टेस्टमॅचेस चालतात' तसे क्रिकेट किंवा फुटबॉल सारखे कुठेही विशेष साधनांशिवाय खेळू शकणारे हे खेळ नाहीत.

हे खेळ रुजायला आणि त्यांचा विकास व्हायला दूरदृष्टी ठेऊन यासाठी प्रयत्न करण्यात आपल्या पार्ल्याच्याप्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचा मोलाचा वाटा आहे. कै. डॉ. रमेश प्रभू हे पार्लेकरांसाठी सतत झटणारे एक लाडके व्यक्तिमत्व. आपल्या राजकीय वाटचालीत त्यांनी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण तत्वावर कायमच त्यांच्या कर्मभूमीपार्ल्याच्या विकासाचा विचार अग्रणी ठेवला. या विचारसरणीतून पंचवीस वर्षापूर्वी



एका मोकळ्या दुर्लक्षलेल्या भूखंडावर उभे राहिले ते आज दिमाखात वाटचाल करणारे प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल. डॉ. प्रभूंनी या संकुलामुळे समाजातील क्रिकेटज्वरावर उपचार करत इतर पोषक क्रीडा औषधांचा समावेश पार्लेकरांच्या जीवनात केला. आज डॉक्टरांनंतर त्यांचे चिरंजीव श्री. अरविंद प्रभू या संकुलाचा डोलारा समर्थपणे सांभाळत आहेत. एका ध्येयासाठी सुरु केलेल्या या रोपट्याचा आज एक विविध शाखांचा वटवृक्ष झाला आहे.

आजकाल मुंबईत कुठल्याही रिक्रिएशन क्लबचे सभासद व्हायचे असेल तर लाखो रुपयेभरुनही होता येईलच याची शाश्वती नसते. अशावेळी समाजातील सर्वांसाठी म्हणजेच विद्यार्थी ते ज्येष्ठ नागरिकांसाठी मोकळ्या वातावरणात योग्य प्रशिक्षक आणि योग्य साधनांसह शारीरिक आणि मानसिक सुदृढता जपायला हे क्रीडा संकुल उभे आहे. इथे ऑलंपिक स्तरावरचा स्विमिंग पूल आहे. जवळजवळ २५ विविध क्रीडाप्रकार शिकवायला इथे तज्ज्ञ प्रशिक्षक आहेत. एकेकाळचा पार्ल्यापुरता मर्यादित असलेले हे संकुल आज मुंबईच्या पश्चिम उपनगरातले एक महत्वाचे प्रथा श्रेणी क्रीडा स्पर्धा भरवू शकणारे क्रीडा केंद्र बनले आहे. इथे प्रशिक्षण घेतलेले आणि सरावासाठी आलेले अनेक खेळाडू आज पार ऑलंपिकमध्ये भारताचे नेतृत्व करत आहेत. 'परमिता' हा या संकुलाचा उपक्रमच ऑलिंपिकदर्जाचे खेळाडू तयार करण्याचा आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात गुणवत्तेला कमतरता नाही. पण दुर्दैवाने हि गुणवत्ता हेरायला आणि तिला योग्य पैलू पाडत या गुणवत्तेच्या खाणीतून मिळालेल्या नैसर्गिक हिऱ्याना स्पर्धात्मक जगासाठी योग्य पैलू पडून तयार करण्याच्या सुविधांचा अभाव अजूनही आहे. प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाने नेमके हेच उद्दिष्ट ठेवत आपली रौप्यमहोत्सवी वाटचाल करताना अशा अनेक हिऱ्याना पैलू पाडत जागतिक पटलावर चमकावले. कुठच्याही खेळाडूला जागतिक स्तरावरची कामगिरी करायची असेल तर नुसते क्रीडानैपुण्य अजून आजकाल चालत नाही. याला जोड म्हणून त्याचा आहार, क्रीडा वैद्यकीय गरजा, फिजिओथेरपी आणि मानसिकता या चतुसुत्रीवर त्याचे यश अवलंबून असते. या संकुलात एखाद्या होतकरू क्रीडापटूंच्या गुणदोषाचा अभ्यास करून त्याला योग्य मार्गदर्शक कार्यक्रम आखून दिला जातो. बरं हे सर्व करायचे तर त्याला आर्थिक पाठबळ हवेच आणि सरावासाठी जागतिक दर्जाच्या



स्पर्धात भाग घेणे क्रमप्राप्त ठरते. आज जे आपण हॉकी, बॉक्सिंग किंवा वेटलिफ्टिंग साठी भारतीय ऑलंपिक महासंघ हे आर्थिक पाठबळ आणि सर्व सुविधांचे प्रयत्न करताना दिसतो तेच प्रयत्न हे क्रीडा संकुल गेली अनेक वर्षे दूरदृष्टीने करत आहे.

क्रीडा संकुलाचे अध्यक्ष श्री. अरविंद प्रभू यांच्याशी या रौप्यमहोत्सवी वाटचालीबद्दल बोलताना जाणवले ते म्हणजे डॉ. प्रभूंना हे क्रीडा संकुल चालू करताना जी आव्हाने आणि गुणवत्ता यांच्यात कसरत करावी लागली तीच आजही करावी लागते. हे क्रीडा संकुल मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असल्याने इथे समाजातील सर्व थरातील लोक येऊ



शकतात. जेव्हा ही लोकांची सरमिसळ असते तेव्हा नियमांचे काटेकोर पालन करून गुणवत्ता राखायचे शिवधनुष्य पेलणे कठीण असते. दुसरे असे कि महानगरपालिकेचे संकुल म्हणजे सुविधा, स्वच्छता यथातथाच असतील अशी एक सर्वांची ढोबळ कल्पना असते. लोकांना या कल्पनेतून बाहेर काढून इथे यायला प्रवृत्त करणे हे पहिले आव्हान होते. क्रीडा संकुलाच्या सुरवातीच्या काळात मर्यादित सभासदत्व देण्यात आले पण नंतर प्रत्येक खेळासाठी वेगवेगळे प्रवेश देण्यात आले. यात पुन्हा हेतू हाच कि सर्वसाधारण सभासदत्वाच्या ओझ्याखाली न दबता प्रत्येक खेळाडूला आपल्या आवडीच्या खेळात प्रवाहस घेता यावा. इथल्या ऑलिम्पिक दर्जाच्या जलतरण तलावाची गुणवत्ता राखताना स्वच्छतेला प्रथम प्राधान्य दिले जाते. फिल्टरेशन, रोजच्या रोज पाण्याची गुणवत्ता तपासणे हे कटाक्षाने केले जाते.

हे क्रीडा संकुल हजारो खेळाडूंचे पहिली मुळाक्षरे गिरवायचे प्रांगण आहे. आज नेमबाजीसाठी ऑलिम्पिकला पात्र झालेला रुद्रांशपाटीलने आपले नेमबाजीचे पहिले धडे याच संकुलात गिरवले. त्याच्या जडणघडणीत



प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे योगदान तो आजही मान्य करतो. डायव्हिंगमध्ये आठ वेळा राष्ट्रीय चैम्पियन असलेला तुषार घाटे, जिम्नॅस्टिक्स मध्ये नाव कमावणारे वंदिता रावळ आणि निशांत करंदीकर सारखे हजारो गुणी खेळाडू या संकुलाने घडवले. इथले नेमबाजी आणि जलतरण प्रशिक्षण आणि सुविधांनी भारताला अनेक नामांकित क्रीडापटूमिळवून दिले. नेमबाजीत अनेक विक्रम रचणारी अंजली भागवत- वेदपाठकनेही याक्रीडा संकुलाचीच खेळाडू. अर्थात इथे एका ठराविक पातळीपर्यंत केहलदु सर्व करतात पण याचसरावामुळे त्यांना पुढे साई (स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया) मध्ये प्रवेश मिळतो.

आज हे क्रीडासंकुल आपला रौप्यमहोत्सव दिमाखात साजरा करत आहे. भारतासारख्या देशाला ऑलिंपिक, कॉमनवेल्थ सारख्या स्पर्धात उत्तम कामगिरी करायला खरं तर प्रत्येक शहरात असे संकुल असणे गरजेचे आहे डॉ. रमेश प्रभूंच्या दूरदर्शीपणामुळे आज निव्वळ पार्लेकरच नाही तर अनेक ठिकाणचे खेळाडू या संकुलाचा लाभ घेत आहेत. रौप्यमहोत्सवाच्या शुभेच्छा तर आहेतच पण इतके उत्तम खेळाडू घडवणाऱ्या संकुलाकडून पुढच्या वाटचालीत अपेक्षा नक्कीच वाढत जातील.



**निमिष वा. पाटगांवकर**
९८७०४ ६९९९३

## पाहुणा पाल्र्याचा (पार्लेकट्टा - नोव्हेंबर ५, २०२२)

# स्वरतंत्र आणि मंत्र विश्वातले दोन जादुगार..अवलिया कलाकार..

### मुक्त व्यासपीठ : प्रसाद फणसे



डबिंग क्षेत्रातील मोजक्या मंडळीतलं नाव..बरेचदा घरच्या मंडळींना काय वाटेल हे लक्षात घेऊन ठरवलेली वाट वा अशी बंधनं झुगारून स्वत:ची ताकद, कुवत ओळखून चोखाळलेली बिकट असली तरी अनवट वाट चालणं याला धैर्य लागतं. तसंच अशा आडवळणांवर स्थैर्यही तितकच लागतं. प्रसाद हा दुसऱ्या वाटेवरचा..या क्षेत्रातील गंमती, पद्धती, आव्हानं व संधी याबाबत मोजक्या वेळात आम्हा प्रेक्षक श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याचं काम प्रसादने उत्तम केलं.

### विदुषी देवकी पंडित...

सर्वार्थाने एक प्रगल्भ अभ्यासू विचारवंत विदुषी गायिका..

काल जो देवकीताईंनी आठवणींचा पट अलगद उलगडला ...त्यात नवीन माहिती व अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरं हे दोन्ही साधलं गेलं..

प्रत्येकाला जन्मजात काहीतरी बाळकडू मिळतंच पण ते मेहनतीनं, नेटानं, उत्तम गुरूंच्या वरदहस्तानं, रियाजानं सालंकृत करणं हा कळसाध्याय. पं वसंतराव कुलकर्णी, अभिषेकी बुवा व गानसरस्वती किशोरीताई अशा ज्येष्ठ गुणी गुरूंचा आशीर्वाद लाभणं हा भाग्याचा भाग असला तरी चौकटीत राहूनही वेगळा विचार करणाऱ्या देवकीताई विरळाच. टीपेचा विलक्षण स्वर लाभलेल्या या कलावतीने शास्त्रीय उपशास्त्रीय सुगम या संगीताच्या सर्व प्रकारात विहरत आपला एक वेगळा ठसा उमटवलाय हे निश्चित. मैफीलीतलं काटेकोर सादरीकरण



तसंच खळेकाका, श्री अशोक पत्की, भावगंधर्व हृदयनाथ मंगेशकर अशा दिग्गज मंडळींची साथ घेऊन त्यांना साजेशी सुगम गीतं गाणं हे देवकीताईंसारखा प्रतिभा लाभलेला कलाकारच करू जाणे.

रागांच्या नियोजित कालमर्यादा व स्वरबंधने पाळणे की नाही याबाबत छान खुलासा झाला. विचारांचे दोन प्रवाह जरी असले तरी कल ती बंधने आनंदाने पाळण्याकडेच दिसला. बरेचदा याची गल्लत होते..काही प्रथितयश मातब्बर कलाकार मनात रेंगाळत असलेले राग पण कालमर्यादा झुगारून रसिकांच्या माथी मारतात.. उदा .प्रात:कालीन मैफिलीत मालकंस वा रात्रीच्या समापनात चारुकेशी वाजवणे. वादन अप्रतिम असतं, ते सर्वसामान्यांना भावतंही. पण चाणाक्ष जाणकारांना ते रुचेलच असं नाही.

चेरी ऑन द केक म्हणतात तसं प्रा केशव परांजपेंनी (माझ्यासाठी जवळचा मित्र केशव) योग्य संवाद साधत खेळीमेळीत घेतलेली मुलाखत. केशव स्वत: संगीताचा जाणकार अभ्यासक आहे. त्याला अनेक थोर गुणीजनांचा सहवासही लाभला आहे..



अमरेंद्र करंदीकर
९८२०० ९६२९९

# ट्विस्टेड टूथ' या लघुपटाला सन्मान

**'ट्विस्टेड टूथ'(Twisted Truth)**

गौतम महाजन लिखित, दिग्दर्शित 'ट्विस्टेड टुथ' ह्या लघुपटाला गोवा लघुपट महोत्सव २०२२ ह्यात नामांकन मिळाले आहे. गौतम महाजन हे एक जाहिरात पदवीधर आहेत. तसेच



त्यांचे असे म्हणणे आहे की "आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या कथा आपण डोळसपणे बघितल्या पाहिजेत". 'ट्विस्टेड टुथ' ची गोष्ट गौतम यांनी काही वर्षांपूर्वी लिहिली होती. तसेच त्यावर लघुपट हा त्यांनी त्यांच्या पदव्युत्तर पदवीच्या अंतिम सेमिस्टरच्या प्रकल्पासाठी निर्माण केला होता. जेव्हा त्यांनी लघुपटाचा सारांश लिहिला तेव्हा योग्य कलाकारांचा शोध घेणे हे जिकरीचे काम होते पण लघुपटाच्या कल्पनेवर असलेला दृढ विश्वास लोकांना त्याकडे खेचणारा होता आणि शेवटी 'ट्विस्टेड टुथ' जिवंत झाला. हातात असणारी मर्यादित साधने आणि शून्य बजेट असताना गौतम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा लघुपट पूर्ण केला आणि त्यांच्या कष्टांचे आज खऱ्या अर्थांनी चीज झाले. गोवा महोत्सवात ह्या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखकाचा (पटकथा) प्रथम पुरस्कार मिळाला. 'आम्ही पार्लेकर' शी संवाद साधताना ते म्हणाले "यशासाठी कोणतीही लिफ्ट नाही. हे पुरस्कार मला आणि माझ्या टीमला नवीन कल्पनांवर अधिक काम करण्यास प्रवृत्त करेल". लवकरच हा लघुपट Vimo च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

लघुपट निर्मितीच्या कामात योगदान असलेले:

मुख्य कलाकार - साहिल सूर्यराव,



निशिता यादव, ओंकार पावसकर, कौस्तुभ कुलकर्णी, मनाली तावडे, तारक साखरदांडे.

निर्माता आणि उत्पादन व्यवस्थापक - यश साळवी, गौतम महाजन

सिनेमॅटोग्राफर - शार्दुल तिकोणे

संगीत आणि आवाज - हर्ष गायकवाड

सहयोगी संचालक - हरिहर मुनी

# सुनील शेंडे.. आदरांजली..

१९६७ साली आम्ही गिरगावांतून पार्ल्यात रहायला आलो. आम्ही संघ परिवारातले असल्यामुळे सहाजिकच त्या परिवारातल्या निर्मलाताई शेंडे आणि त्यांच्या कुटुंबाशी ओळख झाली. त्यामुळेच माझा मोठा भाऊ विनय आपटे (काळा राम) आणि निर्मलाताईंचा मुलगा सुनील शेंडे (गोरा राम) यांची छान मैत्री जमली. दोघेही तरुण होते, व्यायाम करणारे होते, अंगात रग होती, दंगामस्ती करण्याची आवड होती आणि काहीतरी पराक्रम गाजवायची खुमखुमीही होती.

मला पक्कं आठवतं.. १९७१ साली, बांगलादेशच्या मुक्तीसाठी रेडिओवरून ज्या दिवशी भारत-पाक युद्ध घोषित झालं, त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता विनय आणि सुनील, सुनीलच्या मोटरसायकलवरून चर्चगेटला असलेल्या सैन्याच्या भरती केंद्रात 'शॉर्ट सर्व्हिस कमिशन ' घेण्यासाठी दाखल झाले होते. पण त्यांना तिथून पत्र येईपर्यंत युद्ध संपलं होतं. त्यामुळे या दोघांची तातडीनं पराक्रम गाजवण्याची संधी हुकली होती. पण पुढे या काळ्या – गोऱ्या रामांनी, रणभूमीऐवजी रंगभूमीकडे आपला मोर्चा वळवून खूप मोठा पराक्रम गाजवला, ज्याचे आपण सर्वजण साक्षीदार आहेत.

त्याची सुरूवात झाली जेव्हा १९७२ साली




पार्ल्यातल्या टिळक मंदिराच्या नाट्यशाखेनं, राज्य नाट्य स्पर्धेत विजय बोंद्रे यांच्या दिग्दर्शनाखाली 'मेन विदाऊट शॅडोज' नाटक करायचं ठरवलं. त्यातल्या मेन रोलसाठी दमदार कलाकाराचा शोध घेणं सुरू होतं. सुनील स्वत: उत्तम अभिनेता असूनही त्या नाटकात एक दुय्यम भूमिका स्विकारत त्यानं विनयचं नाव सुचवलं.

पुढे स्थापन झालेल्या 'गॉसिप ग्रुप'चा फाऊंडर मेंबर असलेला, प्रसन्न व्यक्तिमत्वाचा सुनील शेंडे, तब्बल ५० वर्ष झगमगत्या दुनियेत राहूनही कधीच कुठल्या 'गॉसिप' चा विषय झाला नाही. तो कुठल्याही मोहाला बळी पडला नाही, कधी वादाचा विषय झाला नाही, त्याच्याबद्दल कधीही अफवा किंवा वावड्या उठल्या नाहीत. कारण सुनील त्याच्या तत्वात बसेल आणि त्याला पसंत पडेल तेच करत आणि बाकीचं चक्क नाकारत गेला.

सुनील शेंडेनं त्याच्या संपूर्ण कारकीर्दीत २० मराठी आणि १ इंग्लिश नाटक, ३४ मराठी आणि ४३ हिंदी मालिका, ३२ हिंदी आणि ४ इंग्लिश चित्रपट, ४ टेलीफिल्म्स आणि ७ ॲड्समध्ये, आपल्या करारी आवाजात अतिशय दमदार अभिनय केला.

पण मुळात 'रंगभूमी' नावाच्या मठाचा सेवक आणि साधक असलेल्या सुनील शेंडेनं, प्रथम विनयला आणि त्याच्यामार्फत आम्हा सर्वांना 'थिएटर धर्मा'ची दीक्षा दिली, म्हणून आम्ही त्याचे अत्यंत ऋणी आहोत, आणि म्हणूनच सुनीलसह आजही आम्ही अभिमानानं म्हणतो, 'Theatre is OUR Religion!'

जगाच्या रंगभूमीवरून अचानक एक्झिट घेतलेला सुनील शेंडे, आताही त्याच्या तत्वानेच चालेल याची मला खात्री आहे. कारण त्यानेच त्याला आनंद, समाधान आणि शांती लाभेल आणि ती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना !



विवेक आपटे
९८२०० ९०८६६

# आयडियल अड्डा



पार्ल्यातील प्रसिद्ध लेखक अशोक बेंडखळे यांचे हे ३६ वे पुस्तक. २९ वर्षापूर्वी काही ग्रंथप्रेमींनी आयडियल बुक डेपोच्या सहकार्याने आयडियल स्तंभ लेखक चर्चा मंच सुरु केला होता, दर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी छबिलदास शाळेच्या सभागृहात ग्रंथविषयक चर्चा व्हायच्या, पाच वर्षात साठ कार्यक्रम झाले. त्यामध्ये दुर्गाबाई भागवत, य. दि. फडके, नारायण सुर्वे, अरुण साधू, माधव गडकरी, कुमार केतकर, नरेंद्र जाधव अशा अनेक नामवंतांनी हजेरी लावली, ग्रंथविषयक एका वेगळ्या उपक्रमाचा लेखाजोखा या पुस्तकात मंचचे प्रवर्तक श्री बेंडखळे यांनी मांडला आहे, एक दस्तऐवज म्हणून या पुस्तकाचे महत्व आहे !

# पार्ल्यातील उद्योजकाचा सन्मान

पार्ल्यातील उच्चविद्याविभूषित उद्योजक प्रफुल्ल शिर्के वयाच्या ७३व्या वर्षी ही राष्ट्रीय पातळीवरील विविध उपक्रमात सक्रीय सहभाग घेतात. त्याचीच दखल नवी दिल्ली येथील ग्लोबल इकॉनॉमिक प्रॉगेस अँड रिसर्च असोशिएशन घेतली तसेच त्यांनी शिर्के यांना बँगलोर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात एशियन आयकॉन गोल्ड मेडल अवॉड देऊन सन्मानित केले.

कृषी विद्यापीठाचे उपकुलगुरु एच.शिवांना, भारत संचार निगमचे सल्लागार सदस्य लक्ष्मी नारायण स्वामी यांच्या हस्ते शिर्के यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी विविध राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित त्यांची कन्या राधिका राकेशसिंह मोहितेपाटील याही उपस्थित होत्या. अनेक वर्षांपासून ते शिर्के हे पार्ल्यात स्थायिक आहेत.



पान ४ वरून

## पार्ल्यातील एक थोर व्यक्तिमत्व डॉ. व. दि. कुलकर्णी

बोडससर, भानुमती दातार (मेधा सिधये) आणि व. दि. कुलकर्णी यांचा सहभाग होता. साहित्य आणि 'साहित्येतर ललित कला' या संदर्भात एक परिसंवाद आयोजित केला गेला होता. त्यात चित्रकार गोंधळेकर, आंबेरकर, धोंड, सातवळेकर, शिल्पकार पानसरे आणि व.दि. कुलकर्णी सहभागी झाले होते. व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांचीही प्रात्यक्षिकांसह मुलाखत आयोजित केली होती. अशा प्रकारच्या अनेक विविध उपक्रमात व. दि. चा पुढाकार असे. कधी ते कार्यकारिणीवर असत कधी नसतही. परंतु त्यांचे मार्गदर्शन, सल्ला आणि प्रत्यक्ष काम या सगळ्याचा लाभ लो. से. संघाला खूपच झालेला आहे. त्यांच्या बरोबरीने अनेक कार्यकर्ते जिवाभावाने काम करीत असत, त्यामुळेच अनेक उत्कृष्ट वाङ्मयीन कार्यक्रमांची मेजवानी पार्लेकरांना मिळाली. पार्ले गावाची सांस्कृतिक उंची वाढतच गेली.

एक ऑगस्ट १९६९ ला मुंबई विद्यापीठात मराठी विभाग सुरू करण्यात आला तेव्हा पार्ले महाविद्यालयातून व.दिं. विद्यापीठात रीडर म्हणून गेले. पुढे १९८१ मध्ये विद्यापीठात मराठी विभागप्रमुख झाले आणि १९८४ मध्ये सेवानिवृत्तीनंतर पुन्हा पुणेकर झाले. व. दिं. च्या जन्मशताब्दी निमित्त पार्ल्यामध्ये एखादे चर्चासत्र किंवा व्याख्यान आयोजित करणे हे त्यांचे ऋण व्यक्त केल्यासारखे होईल असे वाटते.



मेधा सिधये
९५८८४३७१९०





